वुमनविश्व
प्रकाशन



# तो आणि ती

प्रतिक पुरी



**प्रतिक पुरी**

लेखक व पत्रकार असलेल्या प्रतिक पुरी यांच्या 'वाफाळलेले दिवस' व 'चॅलेंज' या दोन कादंब-या प्रकाशित झाल्या आहेत. इंग्रजीत 'द थाऊजंड ब्लुम्स' व 'व्हॉट फिशेस टॉट मी अबाऊट लव्ह ऍंड लाईफ?' या दोन कादंब-या किंडलवर उपलब्ध आहेत. डेलीहंट तसेच बुकहंगामा या ई-बुक्स संकेतस्थळांवर त्यांची 20 पेक्षा जास्त ई-बुक्स प्रकाशित आहेत. स्त्री-पुरुष प्रश्न, लिंग समानता तसेच मराठी साहित्य व्यवहार हे त्यांच्या अभ्यासाचे विषय आहेत.

*स्त्री-पुरुषांमधील भेदभाव मिटावेत,*
*दोघांनाही अर्थपूर्ण, स्वयंपूर्ण जीवन जगता यावं*
*यासाठी प्रयत्न करणा-या प्रत्येकाला*
*हे पुस्तक सादर समर्पित.*

‘तो आणि ती’

‘TO AANI TEE’

A COLLECTION OF MARATHI ARTICLES BY PRATIK PURI

लेखक – प्रतिक पुरी

प्रकाशक – वुमनविश्व प्रकाशन

www.womanvishwa.com

प्रकाशन क्रमांक - १

प्रकाशन दिनांक – मार्च २०१७

किंमत – मोफत

हक्क – या पुस्तकांतील सर्व लेखांचे स्वामित्व हक्क लेखकाकडे (प्रतिक पुरी) आहेत. लेखांच्या पुनर्मुद्रणासाठी लेखकाची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

स्त्री-पुरुष समानता, लैंगिक संवेदनशिलता या  विषयांवरील व्याख्यानांसाठी लेखक उपलब्ध आहेत. त्यासाठी खालील ठिकाणी संपर्क साधता येईल.

ई-मेल –  pratikpuri22@gmail.com

मोबाईल - 8411947502

# लेख संग्रहाविषयी काही विचार...

'वुमनविश्व' या संकेतस्थळावर स्त्री-पुरुष संबंधांविषयी, त्यांच्या प्रश्नांविषयी 'तो आणि ती' या नावाची एक लेखमालिका मी लिहित होतो. त्यातील लेखांचा हा संग्रह आता ई-पुस्तकाच्या स्वरुपात 'वुमनविश्व प्रकाशना'मार्फत प्रसिद्ध होत आहे. महिला सक्षमीकरणाचा ध्यास घेऊन 'वुमनविश्व'ची निर्मिती झाली आहे. त्याचाच एक भाग म्हणजे ही लेखमालिका. या लेखमालिकेत, पुरुषांना स्त्रियांविषयी नेमकं काय वाटतं, पुरुषी वर्चस्वाची मानसिकता का तयार झाली, त्याला तोडण्यासाठी काय प्रयत्न करायला हवेत, स्त्रियांनी स्वतःच्या उन्नतीसाठी काय करण्याची गरज आहे, एकमेकांच्या सहकार्याने अधिक चांगलं जीवन जगण्यासाठी काय करता येईल यासारख्या गोष्टींवर लेख यात लिहिण्यात आले आहेत.

या लेखांना वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला असला तरीही मला एक खंत व निरीक्षणही या निमित्तानं आवर्जून नोंदवावसं वाटतंय. निरीक्षण असं की, स्त्रिया अद्यापही आपल्या प्रश्नांबाबत मुक्तपणे बोलायला तयार होत नाहीत. विशेषतः लैंगिक संबंधांविषयी व त्यातून निर्माण होणा-या बलात्कारांसारख्या घटनांविषयी. लैंगिकता ही माणसाच्या जीवनातील एक महत्त्वाची जैविक घटना आहे ज्याचा शारिरीक व मानसिक प्रभाव माणसांवर कायम असतो. विशेषतः स्त्रियांच्या बाबतीत याचे परिणाम अधिक मोठ्या प्रमाणात दिसून येतात कारण स्त्रीच्या जगण्याशी तिच्या चारित्र्याशी या लैंगिकतेचा थेट संबंध आपल्या प्रतिगामी वृत्तीच्या समाजाने व येथील वर्चस्ववादी पुरुष सत्तेने कायमच जोडलेला आहे. त्याचे अत्यंत भयानक परिणाम शेकडो हजारो वर्षांपासून स्त्रियांना भोगावे लागत आहेत. त्याचाच दुसरा भाग असा की, पुरुषांवरही त्याचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम होत असतात ज्याकडे तर सर्वांचेच दुर्लक्ष होत असते.

पण या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांबाबत स्त्रिया बोलायला तयार नाहीत ही अधिक गंभीर वास्तविकता आहे. याची कारणं अनेक आहेत. पण ती सारी गृहीत धरूनही ज्या सुशिक्षित स्त्रियांकडून याविषयी अधिक प्रतिसादाची अपेक्षा होती त्यांच्याकडूनही या लेखांना हवा तो प्रतिसाद मिळालेला नाही. यावर चर्चा करणं जे अपेक्षित होतं ते झालेलं नाही. मी पुरुष आहे म्हणून याविषयीची चर्चा त्यांनी टाळली असेल तर याचा अर्थ स्त्री-पुरुष समानता हा प्रकार आपल्याकडे अद्याप रुजलेला नाही असा होतो. त्याचा दुसरा अर्थ असाही होतो की, पुरुषांना या बाबतीत बोलण्याचा काही अधिकार नाही, आमचं आम्ही काय ते पाहून घेऊ. हे जर कारण असेल तर तेही तितकंच दुर्दैवी आहे. तिसरं कारण ज्यावर माझा काही प्रमाणात विश्वास आहे ते म्हणजे अनेक स्त्रियांना या विषयांवर चर्चा करणं महत्त्वाचं वाटत नाही. त्यांना करिअरविषयीची चर्चा आवडते. त्याला त्या उत्तम प्रतिसाद देतात लेखांच्या शेअरिंगच्या माध्यमातून. पण लैंगिक विषय, बलात्कार, लैंगिक अत्याचार, कौटुंबिक अत्याचार याविषयी कोणी मोकळेपणानं बोलायला तयार नसतात. त्यामागे संकोच हे कारण असेल तर समजूही शकते. पण त्यापेक्षा आम्हाला याची गरज नाही, अशा घटना आमच्याबाबतीत घडणार नाही असा विश्वास असेल, आम्ही तशा मुली किंवा महिला नाही आहोत असा समज असेल तर मात्र ही नक्कीच गंभीर बाब आहे.

स्त्रिया याच स्त्रियांच्या ख-या व कट्टर वैरी असतात असा एक प्रवाद आपल्यात आहे. मी जेव्हा माझ्या आसपास पाहतो तेव्हा ब-याचदा तो खरा असल्याचंही दिसतं. यात दोन प्रकार आहेत. एक वैर आहे दुस-या स्त्रीशी आणि दुसरं वैर आहे स्वतःशीच. दुस-या स्त्रीला समजून घ्यायला स्त्री कमी पडते का, तिच्या प्रश्नांवर बोलायला, तिला मदत करायला, तिच्यावतीनं लढायला ती मागे पडते का हा एक भाग आहे. दुसरा म्हणजे स्त्री ही स्वतःचीच वैरी बनून स्वतःच्या

उन्नतीसाठी प्रयत्न करायला कच खाते का हा आहे. स्त्रियांना याविषयी काय वाटतं आणि त्याचा ते विचार करणार आहे की नाही याविषयी जाणून घ्यायला मला निश्चितच आवडेल.

स्त्री-पुरुष समानतेविषयी काही चूकीच्या कल्पनाही अनेकांच्या मनात असतात. त्यातली सर्वांत चूकीची कल्पना म्हणजे जे जे पुरुष करतात ते ते स्त्रियांनी करायला हवं, म्हणजे खरी स्त्री-पुरुष समानता येईल. स्त्री-पुरुष हे नैसर्गिक, शारिरीक व मानसिकदृष्ट्या एकमेकांपासून भिन्न असतात त्यामुळे त्यांची स्वतंत्र व्यक्तीमत्त्वं असतात हे आपण लक्षात घ्यायला विसरतोय. एखाद्या स्त्रीनं किंवा पुरुषानं स्त्रीविषयक लिखाण केलं की आपण लगेच त्यांच्यावर स्त्रीवादी असल्याचा शिक्का मारून देतो. मग काही पुरुष स्वतःला पुरुषवादी म्हणून घेत पुरुषांविषयी लिहायला लागतात. या दोन्ही गोष्टी मला चूकीच्या वाटतात. मी स्वतःला व्यक्तीवादी समजतो. मी स्त्री-पुरुषांना व्यक्ती म्हणून मानतो. त्यामुळे त्यांच्या गुण-दोषांची चर्चा करणं सोपं होतं. त्यांना माणूस म्हणून समजून घेणं सोपं होतं. स्त्री-पुरुष हे एकमेकांना पुरक असतात. एकमेकांच्या उणीवा ते भरून काढू शकतात. एकमेकांना अधिक चांगलं जीवन जगण्यासाठी ते प्रेरक ठरू शकतात यावर माझा विश्वास आहे. पण हे व्हायचं असेल तर दोघांमध्ये मूक्त संवाद घडण्याची गरज आहे. एकमेकांना दोष न देता, कमी-जास्त न लेखता हे जर करता आलं तरंच आपण ख-या स्त्री-पुरुष समानतेकडे वाटचाल करू शकतो. ही बाब यासाठी महत्त्वाची आहे की जर स्त्रिया मागे राहिल्या तर पुरुषही मागे राहतील. पुरुष मागे राहिले तर स्त्रियाही मागेच राहतील. दोघांच्या विचारांत व कृतींमध्ये समानता असेल, पुरोगामीत्व असेल, मोकळेपणा असेल, समंजसपणा असेल तरच दोघांचीही प्रगती होण्याची शक्यता आहे. आम्हाला पितृसत्ताक पद्धती अमान्य आहेच पण मातृसत्ताही आम्हाला अमान्य आहे. या लेखांमधून मी हे विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. माझी

मनापासून ही इच्छा आहे की यावर चर्चा व्हावी. त्यांतून काही सबल कृती घडाव्या. त्यासाठी माझ्यासहीत आपल्या सर्वांनाच शुभेच्छा!

या लेखसंग्रहाच्या प्रसिद्धीत सहभागी असणा-या वुमनविश्वच्या संस्थापिका कनक वाईकर, संपादक वर्षा गायकवाड आणि तांत्रिक सल्लागार श्रृती गुप्ता या माझ्या मैत्रिणींचे मनापासून आभार.

प्रतिक पुरी

# अनुक्रमणिकाः-

1- स्त्री-पुरुष समानता, स्त्रीवाद आणि पुरुषांचं शोषण

2- मर्द, मर्दानी व मर्दानगी

3- स्त्री ही पुरुषांची मालमत्ता आहे का?

4- स्त्री खरंच स्वतंत्र आहे का?

5- स्त्री देहाची शोकांतिका – कुमारी माता

6- स्त्री देहाची शोकांतिका – वस्तुकरण

7- स्त्री देहाची शोकांतिका – वेश्याव्यवसाय

8- एकल माता

9- मासिक पाळी – स्त्रियांचा बळी

10- बलात्काराची मानसिकता

11- बलात्कार आणि स्त्री

12- बलात्कार आणि पुरुष



## 1. स्त्रीपुरुष समानता, स्त्रीवाद आणि पुरुषांचं शोषण

**स्त्री-पुरुष संबंध आणि सहकार्याबाबत आपल्याकडे अनेक गैरसमज आहेत. त्यांतून अधिक चुकीच्या गोष्टी जन्माला आल्या आहेत. स्त्री-पुरुष समानता, स्त्रीवाद आणि पुरुषांचं होणारं शोषण या तीन गोष्टींविषयी या लेखात आपण विचार करूयात. तिसरा मुद्दा वाचून अनेकांना हसूही येईल पण तो आहे आणि त्याविषयी अनेक पुरुषांच्या संघटना काम करत आहेत. त्याविषयी नंतर. आधी काही गोष्टी आपण स्पष्टपणे बोलूयात. या तिन्ही प्रकारच्या विषयांमागे स्त्री-पुरुष हे स्त्री-पुरुष आहेत, त्यांना माणूस म्हणून किंवा व्यक्ती म्हणून निर्लिंगी पद्धतीनं वागवलं जात नाही हा खरा प्रश्न आहे. या दोघांचीही एकमेकांविषयीची**

**मतं आणि एकमेकांसोबतचं वागणं हे लिंगाधारीत असतं. म्हणजे एक स्त्री स्त्री म्हणून एका पुरुषाकडे तो पुरुष आहे याच नजरेनं पाहते आणि अर्थात पुरुषही तसेच वागतात. दोघांच्याही मनात आपण माणसं आहोत, व्यक्ती आहोत ही भावना सहसा नसतेच. त्यामुळे पारंपरिक पद्धतीनं स्त्री-पुरुषांवर जे संस्कार लादले गेलेले असतात त्यानुसारच दोघेही एकमेकांशी वागत-बोलत असतात. त्यांतून मग त्याच पद्धतीच्या लिंगाधारीत कृतीही घडत असतात. ज्यात स्त्रियांनी हे करावं ते करू नये आणि पुरुषांनी ते करू नये हे करावं अशा मर्यादांची बंधनं दोघांवरही घातली जातात. अर्थात हे खरंच आहे की यात जास्त नुकसान हे आजवर आणि आजही स्त्रियांचच घडत आलं आहे. पण याचा अर्थ असा नाही की पुरुषांचं नुकसान झालेलं नाही. त्यांचंही झालं आहे फक्त त्यांना त्याची जाणीव नाही आहे. जी अलिकडे व्हायला लागली आहे.**

स्त्री-पुरुष समानतेचा मुद्दा अलिकडे काही वर्षांमध्ये जोर धरत आहे. यात दोघेही मानसिक व शारिरीक दृष्ट्या सारखेच आहेत त्यामुळे त्यांनी एकसारखी कामं करायला हवीत असं म्हटलं जातं. मुख्यतः स्त्रियांनी पुरुषांसारखीच सर्व कामं करावीत असा आग्रह धरला जातो. जिथे पुरुष जातात जे करतात तेच स्त्रियांनाही करण्याची अनुमती मिळावी, त्यांच्यावर आजवर जी बंधनं टाकली गेली आहेत ती उठवून त्यांना मुक्त स्वातंत्र्य मिळावं अशी ही मागणी आहे. यात वरवर पाहता काही गैर नाही. पण आपण जरा खोलवर विचार केला तर दिसून येईल की यानं मुख्य प्रश्न सुटणार नाही उलट आणखी काही नवे प्रश्न निर्माणच होणार आहेत. पहिले हे लक्षात घ्यायला हवं की आपण तथ्यांचा स्वीकार करण्यात नेहमीच मागे पडतो. खरं तर त्यात लाज बाळगण्यासारखं काहीच नाही. उलट तथ्य नाकारून आपण स्वतःलाच संकटात घालत असतो आणि अधिक प्रश्न तयार करत असतो. स्त्री-पुरुष समानता ही तात्त्विक बाब असायला हवी पण आपण त्याला शारिरीक व मानसिक गोष्ट करून ठेवली आहे. स्त्री-पुरुष हे निसर्गातःच मानसिक व

शारिरीकदृष्ट्या समान किंवा सारखे नाहीत हे आपण आधी मान्य करायला हवं. ते दोघेही परिपूर्ण नाहीत हे मान्य करायला हवं. त्या दोघांमध्येही काही बलस्थानं आहेत आणि काही उणीवा आहेत हे मान्य करायला हवं. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे दोघेही एकमेकांच्या सहकार्यानेच परिपूर्ण होत असतात ही गोष्ट आपण मान्य करायला हवी.


समानतेच्या नावाखाली स्त्री-पुरुष आपली वैयक्तिक स्वतंत्र व एकमेवाद्वितीय ओळख विसरत जाण्याचा धोका सध्या निर्माण झाला आहे. त्यांतून त्यांना अनेक बाबतीत स्वतःचीच विनाकारण लाज वाटू लागली आहे किंवा नको तेवढा आत्मविश्वास वाटू लागला आहे. हे लक्षात घ्यायला हवं की पुरुषाची प्रत्येक गोष्ट केल्यानं स्त्रीला काहीही फायदा होणार नाही आणि पुरुषांच्या बाबतीतही तीच गोष्ट आहे. काही गोष्टी या ज्याच्या त्याच्या खास असतात आणि त्या त्यांनाच करू द्यायला हव्यात. प्रयत्नानं एकमेकांच्या गोष्टी एकमेकांना करता येईलही पण त्यातली विशेषतः मात्र त्यात उतरणार नाही. आता काही उदाहरणं घेऊन ही गोष्ट जरा समजून घेऊयात. आपल्या देशांत अनेक ठिकाणी महिलांना मंदिर बंदी असते. त्यांच्या मासिक पाळीचं कारण पुढे करीत या बंदीचं समर्थन केलं जातं. ही मंदिर बंदी उठवावी म्हणून आंदोलनं होत आहेत, काही ठिकाणी ती यशस्वी झाली आहेत, कायद्यानंही त्यांना मान्यता दिली आहे. पण यांतून स्त्रियांचा नेमका काय फायदा झाला आहे त्यांच्या उन्नतीसाठी याचा विचार कोणी करताना दिसत नाही. देवधर्म आणि त्यांच्याशी संबंधीत कर्मकांडात स्त्रियांना अडकवून त्यांचं आजवर कमालीचं शोषण झालं आहे. मग त्याच शोषणात पुन्हा अडकण्याची ही हौस का? धार्मिक कर्मकांडांतून स्त्रियांवर कमालीची बंधनं आली आहेत मग पुन्हा त्यात शिरण्याची ही धडपड कशासाठी आहे? या मंदिर प्रवेशामुळे त्यांचं जीवन सुधारण्यास काय मदत होणार आहे? केवळ पुरुषांना प्रवेश म्हणून आम्हालाही प्रवेश हवा हा बालीश हट्ट आहे आणि मूर्खपणाचाही. पुन्हा स्वतःहून स्वतःला

त्याच धार्मिक बंधनात अडकवून घेण्याचा हा अट्टहास का? मासिक पाळी हा नैसर्गिक शरीरधर्म आहे, पुरुषांना जसं वीर्य स्खलन होतं तसाच हा प्रकार आहे, याविषयी जागृती करण्याऐवजी मंदिरात प्रवेशासाठी आग्रह करणं हे प्रतिगामीपणाचंच लक्षण आहे.

समानता ही तत्त्वाची बाब असायला हवी. ती वस्तूनिष्ठ बाब झाली तर ते दोघांनाही फार काळ झेपणारं नाही. स्त्रीवाद ही गोष्ट या समानतेच्या अगदी विरुद्ध आहे आणि ती ना स्त्रियांसाठी योग्य आहे ना पुरुषांसाठी. कारण असं दिसून आलंय की यांत स्त्रिया अत्यंत कर्मठ भूमिका घेत एकांगी बनताहेत. त्याही पुरुषांप्रमाणेच हेकेखोर, दुराग्रही, वर्चस्ववादी बनताहेत जिथं पुरुषांवर बंधंन घातली जातात, त्यांची टिंगल केली जाते, त्यांना हीनवण्यात येतं, त्यांच्यावर बहिष्कार घालण्यात येतो, त्यांना दुय्यम स्थान देण्यात येतं, अगदी तसंच जसं आजवर पुरुषांनी त्यांच्याबाबतीत केलं आहे. यांतून कोणतीही चांगली गोष्ट साध्य होणार नाही. पुरुषांची बरोबरी करण्याच्या नादात ते स्वतःचं स्त्रीत्व गमावत आहेत. स्त्रीवाद हा स्त्रीस्वतंत्रतेचा, तिच्या प्रगतीचा मार्ग बनण्यापेक्षा तिला पुरुषविरोधी, स्वगुलाम बनवणारी बाब ठरते आहे का याचा धोका निर्माण झाला आहे. जो स्त्रीवाद स्त्रियांना पुरुषांपासून दूर नेतो तो चूकीचा आहे. कारण ही गोष्ट बहुधा लक्षांत घेतलीच जात नाही की सारेच पुरुष अत्याचारी नसतात आणि सर्वंच स्त्रियांना पुरुषांविषयी आकस नसतो. कारण त्या दोघांनीही एकमेकांचं अस्तित्त्व जसं आहे तसं स्वीकारलेलं असतं, त्यांना एकमेकांविषयी आदर असतो, एकमेकांना मदत करण्यात त्यांना संकोच वाटत नाही. अतिरेकी स्त्रीवादातून पुरुष शोषणाचे प्रकार जन्माला आले आहेत. त्यांचं प्रमाण अर्थातच कमी आहे पण ते आहे. त्यांतून पुरुषांना स्त्रियांचा तिटकारा निर्माण होण्याचं प्रमाणही वाढत आहे आणि परिणामी स्त्रियांना पुन्हा आपला स्त्रीवाद पुढे नेण्याचं कारण मिळत आहे. हे एक दुष्टचक्र आहे ज्यांतून दोघांचीही सुटका होणं कठीण होत जाईल.

स्त्रीपुरुष दोघांनाही एकमेकांना नाकारून प्रगती करता येणं अशक्य नसलं तरी अतिशय कठीण आहे. एकमेकांचा एकमेकांशी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंध हा येतच राहणार आहे. त्यांच्या शारिरीक, मानसिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक गरजा भागवण्यासाठी त्यांना एकमेकांची गरज ही लागणारच आहे. त्यांच्या संबंधात जितका मोकळेपणा असेल तितक्या सहजपणे या गरजा पूर्ण होतील. त्यासाठी गरज आहे ती व्यक्ती म्हणून एकमेकांना समजून घेण्याची, एकमेकांचा आदर करण्याची आणि कोणत्याही अटींविना एकमेकांना सहकार्य करण्याची. हे करण्याची सुरूवात आपण आपल्यापासूनच करूयात. हा संवाद पुढेही कायम ठेवूयात. तूर्तास इतकंच.

***




## 2. मर्द, मर्दानी व मर्दानगी

सिमाँ द बोव्हाँ यांनी त्यांच्या 'द सेकंड सेक्स' या ग्रंथात म्हटलंय की, स्त्री ही जन्माला येत नाही तर ती घडवली जाते. नेमकं हेच विधान पुरुषांच्या बाबतीतही तितकंच खरं आहे. जन्मतः कोणालाही आपण स्त्री-पुरुष आहोत हे माहीत नसतं आणि बरीच वर्षं आपल्या व आपल्या मित्र-मैत्रिणींमध्ये काही फरक आहे याची त्यांना जाणीवही नसते. ती जाणीव वयात येण्याच्या काळात सुरू होते. पण जगभर ही नैसर्गिक प्रक्रिया डावलून अगदी लहानपणापासून मुलांवर तू मुलगा आहेस आणि मुलींवर तू मुलगी आहेस याचे शिक्के मारले जाऊन त्याप्रमाणे त्यांची मानसिकता घडवण्याचं काम आपण सारेच करत आलो आहोत. लिंगभेदाची सुरूवात ही अशी घरातून व अगदी लहान वयापासूनच सुरू होते. त्यामुळे पुढे जाऊन त्याचे जे अनेक दुष्परीणाम दोघांच्याही बाबतीत जाणवतात त्याला त्या मुलांचे आई-वडील, घरातील अन्य नातेवाईक, शेजारचे लोक थेट

**जबाबदार असतात. पण त्यांच्यातही ही लिंगभेदाची संकल्पना त्यांच्या घरच्यांकडूनच आलेली असते व अशी एक परंपराच निर्माण होते जिची मूळं अगदी प्राचीन काळात शोधली जाऊ शकतात. सामाजिक संस्कार, धार्मिक संस्कार, कौटुंबिक संस्कार या सर्वांतून लिंग भेदाचा जो मारा सातत्यानं आपल्यावर केला जातो त्यांतून आपण व्यक्ती म्हणून वाढत नाही, विकास पावत नाही तर स्त्री किंवा पुरुष म्हणून वाढत जातो. आपल्या सर्व शारिरीक, मानसिक, भौतिक, अभौतिक जाणिवांवर हा लिंग भेद इतक्या मोठ्या प्रमाणात थोपला जातो की त्यांतून बाहेर पडणं जवळपास अशक्य होऊन बसतं. तसा कोणी प्रयत्न केलाच तर त्याला अनेक अडचणींना विरोधांना सामोरं जावं लागतं. ज्याची सुरूवात घरूनच होते.**

या लिंगभेद संस्कारातील एक महत्त्वाचा संस्कार, म्हणजे पुरुष हा कणखर असतो, बळकट असतो, किंवा ज्याला मर्द म्हणतात तसा तो असतो आणि बायका या बावळट, कमकुवत, असतात, हा आहे. त्याची उदाहरणं आपल्या अवतीभवतीच्या व्यवहारात इतक्या मोठ्या प्रमाणात व सहजतेने आढळतात की त्यात काही गैर आहे याची ना पुरुषांना जाणीव होत ना बायकांना. अर्थात अलीकडे त्याबाबत थोडी जागरुकता वाढत चालली आहे पण त्यानं अद्याप परिणामकारक रुप घेतलेलं नाही. ही उदाहरणं काय आहेत? मर्द को दर्द नही होता, पुरुष रडत नसतात, ज्याच्यात धमक नाही तो पुरुष म्हणजे बायल्या, एखाद्या पुरुषाचा पानउतारा करण्यासाठी त्याला हातात बांगड्या भरायला सांगणे अशी अनेक उदाहरणं देता येतील. याच्या विरूद्ध एखाद्या स्त्रीनं काही कर्तृत्व दाखवलं तर ती मर्दानी आहे, ती वागण्याबोलण्यात मोकळी असेल तर ती पुरुषी आहे ( ती चालू आहे आणि उपलब्ध आहे हेही), तू माझी मुलगी नाही तर मुलगाच आहे वगैरे. या दोन्ही प्रकारांत स्त्रियांनाच कमी लेखण्यात आलं आहे हे तर आहेच पण त्याचवेळी पुरुषांवरही अनावश्यक महानतेचं दडपण आणून त्यांचंही मानसिक खच्चीकरण

करण्यात येतंय हे दिसून येईल. स्त्री-पुरुषांना व्यक्ती म्हणून न वागवता त्यांच्यावर लिंगाधारीत जाणीवा थोपून त्यांच्याकडून तथाकथित स्त्री-पुरुषांचीच कामं केली गेली पाहिजे असा आग्रह धरण्यातून या चूकीच्या असमंजसपणाच्या धारणा तयार झाल्या आहेत.



*स्त्री-पुरुष समानता म्हणजे नक्की काय हे जाणून घेण्यासाठी या छायाचित्रावर क्लिक करा. तुमच्याकडे इंटरनेट उपलब्ध असेल तर हा व्हिडीओ तुम्ही पाहू शकाल.*

मर्द को म्हणजेच पुरुषांना दर्द होत नाही अशी एक धारणा आहे. ते रडत नसतात अशीही. पुरुष काही लोखंडाचे बनलेले नसतात त्यामुळे त्यांना जखमा झाल्याच तर त्यांतून रक्त वाहतंच, हाडं दुखावली तर वेदना होतातच पण त्या न दाखवता जो मुकाटपणे सोसतो तो खरा मर्द हे या धारणेमागचं कारण. ही सहनशक्ती आहे आणि तिचा लिंगाशी काहीही संबंध नाही. सहनशक्तिच्या परीक्षेत पुरुष नाही तर स्त्रिया कायम त्यांच्या पुढे आहेत. प्रसवकाळात जी स्त्री आपल्या मुलाला जन्म देते त्या वेदना जगातील कोणताही पुरुष सहन करू शकत नाही. त्याची तुलनाच करता येत नाही. शारिरीक श्रमांच्याच बाबतीत नव्हे तर मानसिक सहनशक्तिच्या बाबतीतही स्त्रिया या पुरुषांपेक्षा कायम पुढे असतात. स्त्रिया रडतात वारंवार

रडतात त्या त्यांच्या नैसर्गिक शारिरीक रचनेमुळे. त्याचा त्यांच्या कमकुवतपणाशी काहीही संबंध नसतो. ती विरेचणाची एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. त्यामुळे मन हलकं होतं आणि शरीराचा ताण कमी होतो. स्त्रियांना ज्या शारिरीक व मानसिक दबावातून जावं लागतं त्याला तोंड देण्याची ही नैसर्गिक बचाव यंत्रणा आहे. पुरुषांमध्ये ती नसते, त्यामुळे त्यांच्या डोळ्यांतून सहसा आसवं बाहेर पडत नाहीत, पण त्यामुळे त्यांच्यात एक अंतर्गत ताण निर्माण होतो जो त्यांच्या हिंसक वागण्याला जन्म देतो. त्यामुळे रडणं ही काही कोणाच्या योग्यतेची कसोटी नाही. पुरुष रडतात म्हणून ते बायकी ठरत नाहीत. तसं त्यांना म्हणणं हा स्त्रियांचा अपमान करणं आहेच पण त्या पुरुषांवरही अनावश्यक दबाव टाकण्यासारखं आहे. उलट तणावात पुरुष जितके रडण्याचा प्रयत्न करतील तितकं त्यांना बरंच वाटेल.

स्त्री प्रतीकांचा अपमानास्पद वापर करून पुरुषांना हिनवण्याची एक घाणेरडी प्रथा आपल्यात रुढ आहे. एखाद्याच्या हातात बांगड्या भरणे, किंवा भरायला सांगणे यांतून त्या पुरुषाचं कर्तृत्व नाही हे सूचीत केलं जातं. पण त्याचा दुसरा अर्थ ज्या स्त्रिया बांगड्या भरतात त्या कर्तबगार नाहीत असा होतो हे लोकांच्या लक्षातच येत नाही. बांगडी हे सौभाग्याचं लक्षण आहे, स्त्री सौंदर्य खुलवणारा दागिणा आहे, पण त्याचा संबंध हा नको त्या गोष्टीशी लावण्यात आला आहे. बाया घरात जी कामं करतात तितकी कामं पुरुष बाहेर करत नसतात. बायकांना घरात डांबून ठेवायला पुरुषी मानसिकता जबाबदार आहे. आज बायका बाहेर पडून जी कामं करताहेत ती बघता त्या कोणत्याही बाबतीत पुरुषांपेक्षा कमी नाहीत हेच सिद्ध होतं. तरीही आपण अजूनही त्या वर्चस्ववादी मानसिकतेतून बाहेर पडलो नाही.

स्त्रियांच्या बाबतीतही त्यांच्या कर्तबगारीचं माप हे पुरुषी प्रतीकांनीच मोजले जातात. म्हणजे एखाद्या स्त्रीला ती मर्दानी आहे असं म्हणणं, किंवा ती पुरुषासारखी खमकी आहे असं म्हणणं. मूळात याची काय गरज आहे? स्त्रीच्या

कर्तबगारीला नेहमी पुरुषांच्या तुलनेतंच मोजायची काहीही गरज नाही. आणि पुरुषांनाही स्त्रियांच्या क्षमतेवरून टोमणे मारून हिनवणंही चुकीचंच आहे. दोघेही शारिरीक व मानसिकदृष्ट्या निसर्गतः वेगळे आहेत आणि या वेगळेपणाचा कोणत्याही अहंकारावीना सहजपणे स्वीकार करणं आवश्यक आहे. त्यांना व्यक्ती म्हणून वागणूक देणं महत्त्वाचं आहे. त्यांची एकमेकांशी तुलना करण्यापेक्षा त्यांना स्वतंत्रपणे वाढण्याची संधी देणं महत्त्वाचं आहे. जिथं कोणत्याही दडपणावीना हे स्वातंत्र्य दिलं जातं तिथं त्यांचा सर्वांगीन विकास होतो व जिथं हे होत नाही तिथं त्यांची अधोगती होते. जी पुढच्या पिढीतही उतरत जाते. हे दुष्टचक्र संपवण्याची सुरूवात आपण आता आपल्यापासूनच करायला हवी. स्त्री-पुरुष दोघेही आपापल्या परीनं जसे श्रेष्ठ आहेत तसंच त्यांच्यात काही उणीवाही आहेत. व्यक्तीनुसार त्यात बदल होत असतो. एकमेकांना ओळखून एकमेकांना पुरक ठरूनच त्यांना एकमेकांची अधिक चांगल्या पद्धतीनं मदत करता येईल, ज्यात त्यांचाही वैयक्तिक विकास होईल. तेव्हा आपण प्रगतीचा मार्ग चालायचा की अधोगतीचा हे ज्यानं त्यानं ठरवण्याची गरज आहे. त्याचे जे परिणाम होतील त्यालाही तो व तीच जबाबदार असणार आहेत.

***



## 3. स्त्री ही पुरुषांची मालमत्ता आहे का?

**मातृसत्ताक पद्धती संपत असतानाच स्त्रीचं वैयक्तिक आणि सामाजिक स्थान व महत्त्वही धोक्यात येण्याची प्रक्रिया सुरू झाली. स्त्रीची व्यक्ती म्हणून असलेली ओळख संपली आणि तिच्या वस्तूकरणाला सुरुवात झाली. एखाद्या वस्तूची किंमत जशी त्याच्या उपयोगावरून, बाह्य स्वरुपावरून, त्याच्या टिकावूपणावरून ठरवली जाते त्याचप्रमाणे स्त्रीचं मूल्यमापण करण्यात येऊ लागलं. जास्त मुलांना जन्म देणारी स्त्री बहुप्रसवा माता म्हणून गौरवली जाऊ लागली. घरकामात व शेतकामात वाकबगार असणा-या स्त्रियांना गुलाम व दासी म्हणून मागणी वाढली. तर सुंदर स्त्रिया या राजकीय, सामाजिक संघर्षाच्या केंद्रस्थानी आल्या. एकंदरीत पाहता त्यांचं व्यक्ती म्हणून असलेलं स्थान धोक्यात आलं आणि वस्तू म्हणूनच त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन पुरुषांनी अवलंबला. स्त्री ही पुरुषांची**

**मालमत्ता होण्यास या गोष्टी कारणीभूत ठरल्या. पुरुषांचे मानापमान, त्याचं राजकीय व सामाजिक वर्चस्व, त्याचं वैयक्तिक पौरूषत्व या सर्व गोष्टींचं मूल्यमापण करण्याचं माप स्त्री ठरली. ज्याच्याकडे जास्त स्त्रिया, जास्त सुंदर स्त्रिया तो जास्त बलवान ठरला. त्यांतूनच आपल्या शत्रूची नाचक्की करायची असेल तर त्याच्या स्त्रिया पळवायच्या किंवा त्यांच्यावर बलात्कार करायचे हे प्रकारही सुरू झाले. जो आपल्या स्त्रियांचं रक्षण करू शकत नाही तो नपुंसक पुरुष ठरला गेला. रामायण हे या मानसिकतेचं उत्तम उदाहरण आहे. रावणानं आपल्या श्रेष्ठत्वाचं प्रतीक म्हणून आपल्या सर्व शत्रूंच्या स्त्रिया पळवल्या. शेवटी रामाच्या बाबतीतही तेच केलं. रामानं देखील सीतेसाठी नाहीतर आपलं पुरुषत्त्व सिद्ध करण्यासाठी रावणाशी युद्ध केलं.**

ही मानसिकता आज पुरुषांच्याच नव्हे तर स्त्रियांच्या मनातही खोलवर रुतली गेली आहे. बदलत्या काळासोबत त्याची रुपं तेवढी बदलत गेली. त्यापैकी काही गोष्टींचा इथे विचार करूयात. स्त्री ही आजही पुरुषाच्या अधीन असलेली मालमत्ता मानली जाते. तिच्यावर कुटुंबाची अब्रू अवलंबून आहे असं तिच्या मनावर ठसवलं जातं. तिला काही झालं तर ही अब्रू धूळीस मिळते. मुख्य म्हणजे त्याचे सारे वाईट परिणाम हे त्या स्त्रीलाच भोगावे लागतात. त्यांतून पुरुषांची सहसा सुटकाच होते. बरं ही अब्रू धूळीस मिळण्याचा जो प्रसंग असतो त्यासाठी ती स्त्री किती जबाबदार आहे हे जाणून घेण्याची तयारी कोणीही दाखवत नाही. पुरुष तर नाहीच पण घरातील अन्य स्त्रियाही नाही. मुलगी म्हणजे परक्याचं धन ही दुसरी मानसिकता. अगदी लहानपणापासूनच तिच्यावर तू परकी आहेस हे सतत बिंबवलं जातं. तिचा जन्म म्हणजे कर्जाची सुरूवात. पोरीचा बाप म्हणजे डोक्याला कायमचा ताप या गोष्टी याच मानसिकतेतून जन्माला येतात. मग अशा मुलींवर खर्च कशाला करायचा, फारतर ती नाकीडोळी निटस राहील हे पाहिलं की झालं. लग्न जमवताना तिचं उत्तम सादरीकरण करायचं, जोडीला हुंडा द्यायचा आणि काहीही करून हा

माल खपवायचा इतक्या हीन पातळीची ही मानसिकता आहे. त्यामागे स्त्री ही केवळ एक वस्तू आहे हीच भावना असते. स्त्रीचं दिसणं हे आणखी याच मानसिकतेचं लक्षण आहे. घरातल्या बाईनं परपुरुषांसमोर येऊ नये, तिनं घुंघट घालावा, तिनं फार बोलू नये, तिनं नव-यासमोर नेहमी नटून थटून राहावं, तो म्हणेल तेव्हा त्याची शारिरीक भूक भागवायची या गोष्टी म्हणजे आपल्या घरातली एक मौल्यवान गोष्ट बाहेरच्यांना दिसू न देण्याचा जो लोकांचा अट्टहास असतो किंवा आपल्या मालकीच्या वस्तूचा हवा तसा हवा तेव्हा उपभोग घेण्याचा जो प्रकार असतो तसाच आहे. किंवा मग त्या संपत्तीच्या प्रदर्शनाचा. त्यांतूनच मग मुलगा कसाही असला तरी पोरगी गोरीच हवी, सुंदरच हवी, चष्मा नकोच, कमी वयाचीच हवी, कुमारीकाच हवी, सुशील शांत स्वभावाचीच हवी या अपेक्षा जन्माला आल्यात. ज्या आजही कमी झालेल्या नाहीत. तिथं मुलीचं व्यक्तीमत्त्व काय आहे त्याला महत्त्व नाही, तिचं शिक्षण महत्त्वाचं नाही, तिचं चारित्र्य महत्त्वाचं नाही, महत्त्वाचं आहे ते तिचं दिसणं. आपली बायको नावाची वस्तू सुंदर असावी आणि चारचौघात मिरवता यावी हा छूपा उद्‌देश इथं असतो. यात पुरुष स्वतःला मात्र हेच नियम लावायला कधीच तयार नसतो. त्यामागे मालकीहक्काचीच भावना वरचढ असते. स्त्रीला प्रत्येक बाबतीत गृहीत धरणं, तिच्यावतीनंच सारे निर्णय आपण घेणं, हा देखील मालकीहक्काचाच प्रकार आहे. महिला सरपंच हे त्याचं एक कुख्यात उदाहरण आहे. घरच्या बाईची इच्छा न विचारताच तिला निवडणूकीत उभं करणं, ती निवडूण आल्यानंतर तिला काम करू देण्याऐवजी स्वतःच काम करणं आणि मिरवणं हे प्रकार सगळीकडे सध्या मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. त्याला विरोध करण्याचा एखाद्या बाईनं प्रयत्न केलाच तर तिला घरून-बाहेरून दोन्हीकडून विरोध केला जातो. बाईनं बाईसारखं वागावं ही अपेक्षा त्यातनं व्यक्त केली जाते. तिला स्वतंत्र अस्तित्व नाही, तिला तिच्या पुरुषाच्या सावलीत, त्याच्या मर्जीनंच राहता येईल हा या बाई असण्याचा अर्थ असतो.

हे चित्र बदलायचं असेल तर केवळ स्त्रीलाच नव्हे तर पुरुषांनाही सक्षमतेचे धडे देण्याची गरज आहे. खरं तर पुरुषांनाच याची जास्त गरज आहे. स्त्री-पुरुषांना व्यक्ती म्हणून वागवणं, वागणं हा त्याचा पाया असेल. माझं शरीर कोणाच्या मानापमानाचं कारण बनणार नाही हे स्त्रीनं ठरवायला हवं आणि पुरुषांनीही ते मान्य करायला हवं. स्त्रीचं शरीर हे स्त्रीच्या मालकीचं आहे आणि त्याचं काय करायचं याचा निर्णय घेण्याचा अधिकार तिचा आहे हे देखील मान्य करायला हवं. याचा अर्थ असा नाही की ती आपल्या शरीराचा वाट्टेल तसा उपयोग करायला स्वतंत्र आहे. कारण तसं कोणीही सहसा करत नाही, स्त्रीच नाही तर पुरुषही. आणि असं काही झालं तरी एक व्यक्ती म्हणून त्याची जबाबदारीही त्या स्त्रीवरच असेल. स्त्रीला स्वतंत्र असण्याची जाणीव करून देणेच नव्हे तर तिच्या कृत्यांची जबाबदारीही तिच्यावर टाकणे हे स्त्रीला व्यक्ती म्हणून पाहण्याच्या दृष्टीनं महत्त्वाचं पाऊल ठरतं. जबाबदारी ही माणसाला अंतर्मूख करते, सजग करते, संवेदनशील करते. जबाबदारीच्या भावनेमुळेच अंगातील सूप्त शक्ति जागृत होत असतात. आपली खरी ओळख पटते व समाजात आपलं स्वतंत्र अस्तित्त्व निर्माण करण्यासाठीची प्रेरणाही त्यांतूनच मिळते. स्त्री सक्षमीकरणाचा मार्ग हा तिच्या व्यक्तीकरणातून जात असतो. आणि या प्रक्रियेत पुरुषांचाही सहभाग असावा लागतो. केवळ स्त्रियांनाच हे सांगून उपयोग नाही. सक्षमीकरणाची व्यक्तीकरणाची गरज ही पुरुषांनाही आहे. फक्त ते मनाचं सक्षमीकरण असावं. ज्यामुळे त्यांच्या मनातील स्त्री विषयक रोगट, जुनाट, सनातनी, अशास्त्रीय, अमानवी भावना व विचार नष्ट होण्यास मदत होईल.

ही मानसिकता बदलण्यासाठी सध्याचा काळ अत्यंत उपयुक्त आहे. स्त्री-पुरुषांमधील नात्याला मैत्रीचा पाया असणं ही यासाठी पोषक बाब ठरेल. मैत्री ही नितळ असते, मोकळी असते, स्पर्धाहीन असते. त्यात तुम्ही एकमेकांचा स्त्री किंवा पुरुष म्हणून नाही तर केवळ मित्र म्हणून विचार करता. माणूस म्हणून स्वतःची

वाढ होण्यासाठी नकळत एकमेकांच्या मदतीला जाता. लिंगभेद नाहीसा करण्याचं सामर्थ्य मैत्रीच्या नात्यात आहे. प्रश्न असा आहे की या नात्यावर आपण रक्ताची किंवा लग्नामुळे निर्माण झालेली नाती आरूढ होऊ देणार का? जर तसं झालं तर मात्र आपला प्रवास पुन्हा मागच्या दिशेनेच होईल. दोन मित्रांमध्ये लग्न झाल्यानंतर नवरा बायकोचं नातं प्रभावी ठरू लागलं तर नात्यांमध्ये अडचणी निर्माण व्हायला वेळ लागत नाही. पण हे नातं कायम ठेवूनही आधी आपण मित्र आहोत ही जर भावना मनात असेल आणि त्यानूसार जर वागणं असेल तर बरेच प्रश्न मूळात निर्माणच होणार नाहीत. जर या पिढीत याची सुरूवात झाली तरच येणा-या पिढींमध्ये स्त्री-पुरुष हे केवळ व्यक्ती म्हणून ओळखले जातील अशी आशा आपण करू शकतो. आपण सर्वांनीच यासाठी प्रयत्न करणं गरजेचं आहे. सध्याचं हे चित्र भविष्यात नक्कीच बदलेल आणि असे लेख लिहिण्याची कोणावर वेळ येणार नाही अशी आपण आशा करुयात.

***



## 4. स्त्री खरंच स्वतंत्र आहे का?

या लेख मालिकेतील तिसरा भाग हा ‘स्त्री ही पुरुषांची मालमत्ता आहे का?’ या प्रश्नाची चर्चा करणारा होता. त्यावर अनेकांच्या प्रतिक्रिया मिळाल्या. त्यांतील काही प्रतिक्रिया या अशा होत्या की, पूर्वी जरी असं मानलं जात असलं तरी आता मात्र ही परिस्थिती बदलली आहे. पुरुष देखील आता बरेच माणसाळले आहेत आणि स्त्रियांना स्वतःच्या मालकीची वस्तू वगैरे समजणं त्यांनी आता बंद केलं आहे. विशेषतः नव्या पिढीतील पुरुषांनी. जर ते तसं असेल तर ती नक्कीच आनंदाची बाब आहे. पण आपण इथे काही ठरावीक लोकांचा नव्हे तर बहुसंख्यांचा विचार करतो आहोत. तिथे हे चित्र असंच आहे असं अजून तरी दिसत नाहीय. दुसरं म्हणजे पुरुषांनी स्त्रियांना आपली मालमत्ता समजणं याचं स्वरूपही काळाबरोबर बदलत गेलं आहे. म्हणजे मूळ समस्या तीच आहे पण तिचा चेहरा मात्र बदलला आहे. हा बदल आपण आणखी एका प्रश्नाच्या द्वारे तपासून पाहू शकतो. तो आहे

**आजची स्त्री ही खरंच स्वतंत्र झाली आहे का की तो फक्त एक आभास आहे ज्यात त्या स्त्रियांच नव्हे तर पुरुषही समाधानानं जगत आहेत. यावर या लेखांत आपण थोडं बोलूयात.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं एक प्रसिद्‌ध वाक्य आहे, की 'गुलामाला तो गुलाम असल्याची जाणीव करून द्या तरच तो बंड करून उठेल.' या वाक्यातील 'जाणीव' हा शब्द फार महत्त्वाचा आहे. अनेकांना ती जाणीवच असत नाही त्यामुळे आपलं काही चुकतंय हेच त्यांना मान्य नसतं. आता सध्याच्या पिढीतील भारतीय स्त्रियांच्या बाबतीत ही कसोटी लावून काही उदाहरणं बघितली तरी हे खरं स्वातंत्र्य आहे की छुपी गुलामी आहे ते लक्षांत येईल. स्त्री-पुरुष समानतेचा नारा आज आपण देतो व तसं आपण वागतो असंही अनेकांचं म्हणणं असतं. ही समानता लग्नाच्या दृष्टीनं पाहिली तरी असं दिसून येईल की यात वर्चस्व हे पुरुषांचच आहे. बायका आपल्या नव-यांना अजूनही अहोजाहो करतात, ज्या करतात त्यांचे नवरे त्यांना अहोजाहो करतात का? काही पुरोगामी नवरे आपल्या बायकांना घरी अरेतुरे करण्याची परवानगी देतात (परवानगी शब्द इथे महत्त्वाचा आहे) पण बाहेर मात्र त्यांना तसं केलेलं आवडत नाही. बायकांनी आपल्या कोणत्या मित्रांशी बोलायचं, कोणत्या मैत्रिणीला घरी आणायचं याबाबत नव-याचं मत विचारात घेतलं जातं. बायकोनं गळ्यात मंगळसूत्र घालावं, हातात बांगड्या घालाव्यात, कपाळावर टिकली तरी लावावी, ते तिच्या सौभाग्याचं लक्षण आहे असं सातत्यानं ठसवलं जातं. सात जन्म एकच नवरा मिळण्यासाठी बायकांनीच पुजा करायची, एखादीनं म्हटलं की मला नाही करायची पुजा, मला नकोय तू पुढच्या जन्मी नवरा म्हणून, तर किती नव-यांना ते आवडणार आहे? किती बायकांना या सर्व गोष्टींत काही वावगं वाटत नाही? लग्नाच्या बाजारात मुलींच्या दिसण्याला फार महत्त्व दिलं जात नाही असं काहींचं म्हणणं होतं पण ते महत्त्व आता तिच्या कमाईला आलं आहे हे विसरून चालणार नाही. त्यातही तिचा पगार आपल्यापेक्षा कमीच हवा, ती

जिथे नोकरी करते तिथल्या पुरुष सहका-यांशी तिनं फार मिळून मिसळून वागू नये अशी तिच्यावर बंधनं नसतात का? या सर्व प्रश्नांच्या मागे आपल्या बायकोनं आपलंच ऐकावं ही पुरुषी मानसिकता तर असतेच पण त्या बाईला देखील तिच्या नव-याचं असं वागणं सहसा खटकत नाही, कारण तो आपला नवरा आहे त्यानं अशा अपेक्षा बाळगण्यात काही चूक नाही, तेव्हा आपणच तडजोड करावी, हे सतत तिच्यावर ठसवलं गेलेलं असतं आणि तिलाही तेच योग्य वाटायला लागतं. निदान ती विरोध तरी करत नाही. सोसत राहते. कधी तिच्या संसारासाठी, कधी मुलांसाठी, कधी आपल्या माहेरच्यांसाठी, कधी समाजासाठी. पण मग ही काय फक्त स्त्रीचीच जबाबदारी असते का? संसार घर हे काय फक्त बाईचंच असतं का? पुरुषाची काहीच जबाबदारी नसते का? त्यामुळे पहिला मुद्दा हा की तिला आपल्या गुलामीची जाणीव आहे का हा आहे. दुसरं म्हणजे ती ज्याला आपलं स्वातंत्र्य समजते आहे ते खरं स्वातंत्र्य आहे का हा मुद्दा.

आपल्या देशांत मनुस्मृतीच्या नावाखाली करोडो लोकांना जाच सहन करावा लागला आहे. पण दुःखाची गोष्ट अशी की हा जाच नसून धर्म आहे असं इथल्या लोकांचं ठाम मत आहे. त्याचे संस्कार इतके गडद आहेत की ते जणू आपल्या रक्तातच भिनले गेले आहेत आणि त्यात कोणालाच काही चूक वाटत नाही. मनू सांगतो की स्त्रीला स्वातंत्र्य नाही. मुलगी असेल तर पिता, बहिण असेल तर भाऊ, पत्नी असेल तर पती, आई असली की मुलगा हे सारे पुरुषच तिचं रक्षण करतील, तिच्या जगण्याचे निर्णय घेतील आणि तिनं ते पाळायचे. त्याविरूद्ध वागायचं नाही. कारण तिला स्वतःचं असं स्वतंत्र अस्तित्त्व नाही. ही गोष्ट आपण अगदी आजही घरोघरी पाहू शकतो की नवरा बायकोवर डाफरतो, पोरगा आईवर ओरडतो, भाऊ आपल्या बहिणीवर हक्क गाजवतो आणि पिता आपल्या पोरीच्या आयुष्याचे निर्णय घेतो. या सर्वांना त्या बाईला काय वाटतं हे विचारण्याची गरज वाटत नाही. त्यांनाही दुर्दैव्यानं आपण आपलं काही मत द्यावं असं वाटत नाही. आता नक्कीच


परिस्थिती बदलत आहे पण पूर्णपणे बदलली आहे असं मात्र नाही. कारण कुठेनाकुठे जेव्हा कसोटीची वेळ येतो तेव्हा पुरुषच नव्हे तर स्त्री देखील त्यात अपयशीच होते. पुरुषाला आपला अहंकार सोडवत नाही आणि स्त्रीला बंड करणं जमत नाही.

स्त्री स्वातंत्र्याची अशी एक परीक्षा होते ती तिच्या लग्नाच्या वेळी. लग्नाच्या वेळी अनेक पुढारलेल्या मुलींना आपली जात आठवते. अनेक पुढारलेले आई-बाप आपल्या मुलीनं किंवा मुलानं परजातीतल्या किंवा परधर्मातल्या मुलावर किंवा मुलीवर प्रेम केलं तर ते घराण्याच्या इभ्रतीनं पेटून उठतात. किती वेळा संभोग करायचा, आपल्याला मुल होऊ द्यायचं की नाही, कधी होऊ द्यायचं, मुलगा की मुलगी यात पत्नीचा कितपत सहभाग असतो यावरूनही हे कळून येईल. अनेक ठिकाणी असं दिसतं की नवरा किंवा बायको हे बाहेर फार पुढारलेपणाच्या गोष्टी करतात पण घरी मात्र त्यांचं अगदी उलट वर्तन असतं. त्यांचं पुढारलेपण, त्यांचा पुरोगामीपणा हा निवडक स्वरुपाचा असतो. त्यांना ज्या सुधारणा अडचणीच्या वाटत नाहीत तिथे त्या केल्या जातात पण अडचणीत आणणा-या सुधारणा मात्र या ना त्या कारणानं टाळल्या जातात. समानतेचा हा दुतोंडी चेहरा तर समाजात अनेक ठिकाणी बघायला मिळतो. पुरुषांची व्यसनं आणि स्त्रियांची व्यसनं याकडे आपण कसे पाहतो त्यातूनही ही गोष्ट कळून येते. पुरुषांच्या व्यसनाला प्रतिष्ठा असते पण स्त्रीच्या व्यसनानं मात्र कलियुग आल्याची हाकाटी पेटवली जाते. धर्म रक्षणाची, परंपरा चालवण्याची जबाबदारी बहुतेक स्त्रियांच्या माथीच मारली जाते. आपल्या स्त्रीनं आपल्या आवडी निवडी आपल्यासारख्याच ठेवायच्या किंवा आपल्या इच्छेनेच बदलायच्या हा आग्रह पुरुष धरतात. तिनं एखादी विरोधी इच्छा प्रकट केली तर त्याला अपमान वाटतो किंवा तिचं आपल्यावर प्रेम नाही असं वाटतं. व्यक्ती म्हणून तिला तिच्या स्वतःच्या अशा स्वतंत्र आवडी नावडी असू शकतात याचा विचार किती जण करतात? आज जे लोक आपल्याला सुधारलेले

मानतात, ते उद्या आपल्या मुलांच्या व मुलींच्या बाबतीत किती वेळा सुधारलेलं वर्तन करतात? नव-यानं नोकरी सोडून काही वेगळं काम करायचं ठरवलं तर अनेक बायका त्याला तसं ते करू देत नाही. तेही तेव्हा जेव्हा त्या स्वतः कमावत असतात. आपला नवरा बायकोच्या जीवावर जगतो असं लोक म्हणतील, (ते म्हणतातच) आणि याची त्यांना लाज वाटते. बायकोनं नोकरी करणं आणि नव-यानं घर सांभाळणं हे घडत नाही कारण ती आपली मानसिकता नाही. त्यात पुरुषाला आपला अपमान वाटतो आणि बाईला लाज वाटते. इथे दोघेही चूकतच आहेत पण त्याची जाणीव त्यांना सहसा नसते. अशी शेकडो उदाहरणं आहेत ज्यांतून दिसून येईल की अजूनही स्त्री असो वा पुरुष, दोघेही पूर्णपणे स्वतंत्र झाले आहेत असं म्हणता येणार नाही. दुसरं असं की हे स्वातंत्र्य सातत्यपूर्ण हवं. ती अधिकच अवघड बाब असते. आपल्याला अजून बरीच मजल गाठायची आहे. पण आपण त्यादिशेनं आज विचार करतोय ही देखील आश्वासक बाब आहे आणि त्याचे चांगले परिणाम आपल्याला निश्चितच दिसतील.

मागील लेखांत मी असं म्हटलं होतं की, नवरा-बायकोच्या नात्यांत मैत्री असेल तर बरेच प्रश्न सुटू शकतात. इथे मी असं म्हणेन की प्रत्येकच नात्यांत हा मैत्रीचा पाया असेल तर बरेच प्रश्न सुटतील. मैत्रीत आपण अधिक मोकळे होतो, अधिक स्पष्ट होतो आणि अधिक समंजसही होतो. यामुळे स्त्री-पुरुषांमधील सर्व समस्या सुटतील असं नाही. कारण त्यामागे इतर अनेक घटकही कारणीभूत असतात जे दूर करणं ही फार कठीण गोष्ट आहे. पण आपण प्रयत्नच केले नाहीत तर मात्र काहीच होणार नाही. त्या प्रयत्नांसाठी मैत्री हा एक चांगला उपाय असू शकतो हे मी निश्चित म्हणेन.

***



## 5. स्त्री  देहाची शोकांतिका – कुमारी माता

**आपलं शरीर आपल्या हक्काचं, आपल्या मालकीचं असतं ही साधी गोष्ट आहे. पण स्त्रियांच्या बाबतीत ही साधी गोष्टही खरी नसते. ती एक शोकांतिका होऊन बसते. स्त्रीचं शरीर म्हणजे तिच्या गुलामीचं आणि पुरुषांच्या वर्चस्वाचं चालतंबोलतं उदाहरण. स्त्रियांना आपल्या स्वतःच्या शरीरावरचा हक्कही सिद्ध करावा लागणं हा त्यांच्या व्यक्तीकरणातील एक प्रमुख अडथळा आहे. स्त्रियांकडे व्यक्ती म्हणून बघण्यापेक्षा त्यांच्याकडे एक देखणं उपभोगक्षम शरीर किंवा प्रजोत्पादन करण्याचं साधन म्हणून बघणं ही पुरुषी वर्चस्वाची लक्षणं असतात. पूर्वीच्या मातृसत्ताक व्यवस्थेला स्त्रियांच्या प्रजोत्पादन क्षमतेमुळे जन्म मिळाला**

**होता. तिच्या शरीरातून एक नवा जीव जन्माला येतो ही अद्भूत घटना होती. त्यासाठी तिला दैवी स्थान मिळालं. पुढे मात्र या क्षमतेमुळेच तिचं मालमत्तेत रुपांतर झालं आणि पुरुषांनी तिच्यावर आपला हक्क सांगायला सुरूवात केली. तिच्या शरीरावरचा तिचा हक्क यथाकाल नाकारण्यात आला आणि ती कायमची पुरुषांची गुलाम झाली. तिच्या मनाला गुलाम करण्याची प्रक्रिया तथाकथित सभ्यतेच्या व संस्कृतीच्या सुवर्ण काळात सुरू झाली जेव्हा तिला देवीचं स्थान देण्यात आलं, तिच्यावर धार्मिक व सांस्कृतिक परंपरांचं वहन व जतन करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. त्यासाठी तिला परोपरीनं गौरवण्यात आलं पण त्यामागे तिच्या मनाचं खच्चीकरण करण्याचा एक अत्यंत प्रभावी उपाय योजण्यात येत होता. स्त्रीच्या मनाचं हे खच्चीकरण व शरीराचं वस्तूकरण आजतागायत सुरू आहे. स्त्री देहाच्या या शोकांतिकेचे विविध प्रकार या पुढील काही लेखांमध्ये आपण पाहणार आहोत. त्यातील पहिला आहे कुमारी माता.**

लग्नसंस्थेच्या माध्यमातून या खच्चीकरणाला व वस्तूकरणाला प्रारंभ होतो. तिला तिच्या नव्हे तर घरच्यांच्या आणि त्यातही वडील अथवा भावांच्या इच्छेनुसारच त्यांनीच शोधलेल्या मुलाशी लग्न करावं लागतं. मी आईबापांच्या इच्छेनेच लग्न करेन असं म्हणणा-या मुली किंवा आमची मुलगी आमच्या इच्छेबाहेर नाही असं म्हणणारे आई-वडील, दोघेही यामागील दाहक सत्य मात्र विसरतात. मुलीला आपल्या स्वातंत्र्याची आठवण उरत नाही आणि आईवडीलांना आपल्या मुलीच्या अधिकारांची चिंता असत नाही. लग्नात तिच्या शरीराचा सौदा होऊन तिच्या वस्तूकरणाला पुढचं प्रमाण लाभतं. त्याची कसोटी लागते तिच्या बाळंतपणात. तिला मुल होणं, ही फक्त तिची जबाबदारी मानली जाते, त्यातही मुलगा होणं ही देखील. तसं नाहीच झालं तर तिच्या मनासोबत शरीराचीही विटंबना व्हायला वेळ लागत नाही. जी स्त्री नऊ महिने आपल्या गर्भाचं पालनपोषण करते व नंतरही जन्म दिल्यानंतर जिच्यामुळे ते अर्भक जगतं वाढतं

त्या स्त्रीला इतिहासात कधीही आपल्या या मुलावर हक्क सांगता मात्र आला नाही. यांतूनच कुमारी माता नावाची भयानक शोकांतिका जन्माला आली आहे. ज्या काळात वारस असणं ही अतिशय महत्त्वाची गोष्ट होती त्या काळात स्त्रीच्या शरीराला एका प्रजोत्पादन यंत्रापेक्षा जास्त मान क्वचितच होता. केवळ वारस हवा म्हणून परपुरुषांशी नियोग साधायचा आणि पुत्रप्राप्ती करून घ्यायची अशी अनेक उदाहरणं महाभारतात आढळतात. भारतातील प्राचीन मुक्त लैंगिक स्वातंत्र्याचं उदाहरणं म्हणून ती अधनंमधनं वापरली जातात. पण त्यातील शोकांतिका मात्र दूर्लक्षितच राहते. कारण नियोग पद्धतीतही स्त्रीला पुरुष निवडीचं स्वातंत्र्य नव्हतं. तिला सांगितलं जाईल त्या पुरुषांशी तिला रत व्हावं लागायचं. नियोग करण्याचा अधिकारही तिला नव्हता. वारस मिळवण्यासाठी तिच्या इच्छांची पर्वा न करता हा नियोग साधला जायचा. कुंतीला  वरामुळे पुरुष निवडण्याचा अधिकार मिळाला तरी त्यांना हक्काचं स्थान तिच्या नावामुळे नाही तर पंडूच्या नावामुळे लाभलं. यातली खोच समजून घ्यायला हवी. अन्यथा कर्णाप्रमाणेच तिची बाकीची मुलंही अनाथ किंवा शुद्र म्हणून ओळखली गेली असती. पुढचं महाभारतच घडलं नसतं. मुलांना समाजात सन्मानाचं स्थान मिळणं न मिळणं हे त्यांना जन्म देणा-या स्त्रियांवर नाही तर पुरुषांवर अवलंबून असतं.

ज्यांची लग्न झाली आहेत त्या स्त्रिया असोत किंवा ज्यांची लग्न झाली नाहीत अशा कुमारी माता असो त्यांना कधीही आपल्या अपत्यावर अधिकार सांगता आला नाही. तो अधिकार त्यांच्या मुलांना द्यायचा त्यांच्या नव-याने किंवा ज्या पुरुषानं त्यांचा उपभोग घेतला आहे त्यानं. जर त्यांनी हे आपलं मुल नाही असं म्हटलं तर ती विवाहिता असेल तर तिची व्यभिचारीणी म्हणून गणना व्हायची आणि अविवाहित असेल तर कुमारी माता म्हणून. पुरुषांना आपला हक्क सांगून माताविहिन मुलांचं संगोपण करण्याची मुभा होती पण कुमारी मातांना मात्र तशी मुभा नव्हती. हे फक्त माझं मुल आहे, त्याच्या जन्मदात्यानं जरी त्याचा स्वीकार

करण्यास नकार दिला तरी मी याला माझं मुल म्हणून वाढवू शकते हे म्हणण्याची वा त्याप्रमाणे वागण्याची तिला परवानगी नव्हती. ती आजही नाही आहे. मुलांना आईचं नाव नाही म्हणून ती अक्करमाशी क्वचितच समजलं जातं पण बापाचं नाव नसेल तर मात्र त्यांच्या नशिबी कायमचा तो अपमान येतो. आपल्या मुलांना कायदेशीर अधिकार मिळण्यासाठी, त्यांना समाजमान्यता मिळण्यासाठी किंवा त्यांच्यावर आपला अधिकार सांगण्यासाठीही कुमारी मातेला पुन्हा कोणत्या ना कोणत्या पुरुषाचीच गरज भासते. तिच्या देहाचा हवा तसा उपभोग घेऊन मुल होताच पलायन करणारे पुरुषच असतात आणि तिच्या मातृत्त्वासाठी केवळ तिलाच दोष देत तिचे व तिच्या मुलाचे सन्मानाने जगण्याचे सारे अधिकार व प्रसंगी जगण्याचेच अधिकार नाकारणारेही पुरुषच असतात. तिला यात आपलं कोणतंही म्हणणं मांडण्याची संधी नाकारलीच जाते. बलात्कारामुळे कुमारी माता होणं नशिबी आलेल्या स्त्रियांनाही यातून काहीच सुटका नाही की सहानुभूती मिळत नाही जिथे तिची काहीच चूक नसते.

कुमारी मातांच्या या विविध प्रश्नांकडे आपण आता अधिक जागरूकतेने आणि सहानुभूतीनं पाहण्याची वेळ आली आहे. जे पुरुष अशा मुलींना दोष देतात त्यांनी याचा नक्कीच विचार करावा की निसर्गाने त्यांच्यावर गर्भधारणेची जबाबदारी सोपवलेली नाही त्यामुळेच पुरुष बेदरकार पद्धतीने स्त्रियांचा उपभोग घेत असतात. गर्भधारणेची जबाबदारी दोघांवरही असती तर मात्र पुरुषांनी नक्कीच यात वेगळी भूमिका घेतली असती. स्त्रियांची गर्भधारणा ही त्यांच्या या खच्चीकरणाला कारणीभूत आहे. मानवांचा वंश चालावा म्हणून त्या ज्या सोसतात त्याची ही निव्वळ अवहेलना आहे विटंबणा आहे. त्यांच्या सर्जनाचा तो अपमान आहे. तरुण वयात लैंगिक सुखाच्या अनावर इच्छेला शरण जाणं यात कोणाला दोष देण्याची गरज नाही. गरज आहे त्यांना त्यांच्या जबाबदारीचं भान करून द्यायची. गरज आहे ती यातून गर्भधारणा झालीच तर त्याचा दोष फक्त त्या

स्त्रीलाच देण्याची पुरुषी मानसिकता बदलण्याची. गरज आहे ती तिच्या मातृत्त्वाचा गौरव करण्याची व तिच्या मुलाला सर्व सामाजिक व कायदेशीर अधिकार देण्याची. सर्वांत जास्त गरज आहे ती तिला आपल्या शरीराचं काय करायचं याचा अधिकार देण्याची. तिनं कोणाशी लैंगिक संबंध ठेवावेत हे तिलाच ठरवू देण्याची. तिच्या शरीरातील गर्भाचं काय करायचं याचा निर्णय घेण्याची. यात अपवाद नक्कीच असतील पण नियम हाच असायला हवा की स्त्रीला तिचं शरीर कोणाच्या स्वाधीन करायचं, मूल होऊ द्यायचं की नाही, गर्भ वाढवायचा की नाही, याचे अधिकार मिळायलाच हवे कारण तिच्याच वाटेला यांतून निर्माण होणारे तणाव पुरुषांपेक्षा जास्त येत असतात. कुमारी माता म्हणून तिची हेटाळणी करण्यापेक्षा तिच्याकडून घडलेली एक चूक यापेक्षा जास्त महत्त्व या गोष्टीला देण्याची गरज नाही. ती चूक कशी सुधारता येईल, सुसह्य करता येईल याचा विचार करण्याची आता गरज आहे. जर त्या स्त्रीला ते मूल हवं असेल तर तिला ते मूल तिचं स्वतःचं, तिच्या नावाचं म्हणून वाढवण्याचा हक्कही मिळायला हवा. कोणत्याही सामाजिक बहिष्काराशिवाय, कोणत्याही नीच हेटाळणीशिवाय आणि कोणत्याही कायदेशीर हक्कांची गळचेपी झाल्याशिवाय.

कुमारी मातांचा प्रश्न हा पुरुषी वर्चस्वाचा घृणास्पद नमुना आहे. समाजात जेव्हा सुसंवाद राहत नाही, लैंगिक सुखांना जेव्हा गलिच्छ मानलं जातं, व्यक्ती म्हणून जगण्याचे अधिकार नाकारले जातात तेव्हा स्त्रियाच नव्हे तर पुरुषांनाही त्याचे असह्य परिणाम भोगावे लागतात. हे टाळायचं असेल तर त्यासाठी एक सुरूवात म्हणून अशा कुमारी मातांना सहानुभूतीनं वागवण्याच्या दिशेनं आपण एक पाऊल टाकायला हवं. समाज बदलायचा तेव्हा बदलेल, पण व्यक्ती म्हणून आपण स्वतःला आधी बदलायला हवं. त्यातही एक पुरुष म्हणून मी माझी जबाबदारी स्वीकारणं, स्त्रियांच्या नैसर्गिक असहायतेचा गैरफायदा न घेणं, तिच्या मातृत्त्वाचा अपमान न करणं हे तर आपण निश्चित करू शकतो. लैंगिक इच्छांकडे

निकोप नैसर्गिक इच्छा म्हणून बघता यायलं हवं. तरच कुमारी मातांच्या प्रश्नावर आपल्याला काही निश्चित उपाय शोधता येईल.

***



# 6. स्त्री  देहाची शोकांतिका – वस्तुकरण

**स्त्री देहाची शोकांतिका या आपल्या चर्चेतील आजचा भाग स्त्री देहाच्या वस्तुकरणाबाबत आहे. स्त्रीचं शरीर ही एक वस्तू आहे असं समजून वस्तू खरेदी विक्रिचे सर्व नियम त्याला लावून तिच्या देहाचा बाजार मांडण्याचं काम प्राचीन काळापासून सुरू आहे. आधुनिक काळात जाहिराती आणि चित्रपट या दोन क्षेत्रांमध्ये स्त्रियांचं वस्तूकरण होत असल्याचा सातत्यानं आरोप केला जातो. स्त्री देहाच्या प्रदर्शनाला कायमच वादग्रस्त स्वरुप लाभलेलं आहे. या अनुषंगानं विचार करताना आपण एक गोष्ट नेहमीच विसरतो की स्त्रीचं शरीर हे तिच्या मालकीचं आहे. त्याचं काय करायचं याचा निर्णय घेण्याचा अधिकार सर्वांत आधी तिचा आहे. आपण एकीकडे तिच्या शरीराचा बाजार मांडतोच पण त्याचवेळी तिला मात्र**

**यावर आपलं मत मांडण्याची संधी मात्र देत नाही. याचा जरा विस्ताराने विचार करूयात.**

पहिला मुद्दा हा की खरंच स्त्रियांना असं वाटतं का की त्यांच्या देहाचा बाजार मांडण्यात येत आहे? हे त्या त्यांच्या इच्छेनंही करू शकतात असंही असू शकत नाही का? जिथे जबरदस्ती आहे आणि त्या स्त्रीच्या इच्छेविरूद्ध तिच्याकडून काम केलं जात आहे तिथं आपण समजू शकतो की तिच्यावर अत्याचार होत आहेत. पण एखाद्या स्त्रीनं स्वतःच्या इच्छेनं जर आपल्या देहाचा उपयोग पैसे प्रसिद्धी कमावण्यासाठी केला तर ते खरंच चूकीचं असतं का? की हे सारं काही पुरुषांना आवडत नाही म्हणून ते यावर अनावश्यक चर्चा करतात असं काही आहे का? पुन्हा इथेही एखाद्या स्त्रीनं काय करावं किंवा न करावं, ते योग्य की अयोग्य याचा निर्णय पुरुषांनीच घ्यायचा, स्त्रियांनी घ्यायचा नाही, हे देखील पुरुषी वर्चस्वाचंच उदाहरण नाही का?

जाहिरातींमध्ये फक्त स्त्रियांच नाही तर पुरुषही अंग प्रदर्शन करत असतात. पिळदार शरीरयष्टी असलेले पुरुष आपल्या मसल्स दाखवत अनेक उत्पादनांची जाहिरात करतात. काही गरज नसताना ह्रितिक रोशन आपलं पिळदार शरीर दाखवत एखाद्या डिटर्जंट पावडरची जाहिरात करत नाचतो तेव्हा त्याच्या त्या शरीराचाही ती जाहिरात लोकप्रिय होण्यांत आणि त्याच्या महिला ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी उपयोग हा होतच असतो. मोटारबाईक्स कार्स विकण्यासाठी आणि आता तर साबण विकण्यासाठीही पुरुष मॉडेल उघडे होत असतात. दरवेळी स्वतःचं शरीर उघडं दाखवण्याची गरजच असते असं तर नक्कीच नसतं. दुसरं असं की पूर्वी असं म्हटलं जायचं की स्त्रियांचा ज्या गोष्टींशी काही संबंध नाही तिथेही त्यांचा वापर केला जातो. म्हणजे कार्स, बाईक्स, डीओ, शेविंग क्रिम. यातील पहिल्या तीन गोष्टींवर पूर्वी पुरुषांची मक्तेदारी होती तशी ती

आता राहिलेली नाही. शेविंग क्रिमच्या जाहिरातीत बाई का असा प्रश्न काही विचारतील. पण ती असली तर बिघडलं कुठं? आपल्या नव-यानं, प्रियकरानं गुळगूळीत दाढी करून मस्तपैकी आफ्टर शेव लोशन चोपडलं तर ते कोणत्या बायकोला, प्रेयसीला आवडणार नाही? दरवेळी प्रत्येकच गोष्टींत स्त्रीवर अत्याचारच होतो असं समजताना आपण तिला काय वाटतं हे विचारात न घेऊन तिच्यावर मोठा अन्याय करत नसतो का?

जाहिरातींप्रमाणेच चित्रपटांमध्येही अंग प्रदर्शन केलं जातं आणि त्यात स्त्री पुरुष दोघेही आघाडीवर आहेत. सलमान खान किंवा जॉन अब्राहम जेव्हा शर्ट काढतो तेव्हा त्यांना पाहून बेभानपणे किंचाळणा-यांमध्ये तरुण पोरी जास्त असतात. त्यांचं टॉपलेस होणं आपण स्वीकारलंय. म्हणजे पुरुषी समाजानं स्वीकारलंय. पण राधिका आपटे किंवा रिचा चढ्ढानं नग्न दृष्ये दिली तर मात्र त्यांच्यावर लगेच आरोपांच्या फैरी झाडल्या जातात. ते हेच लोक असतात ज्यांना सलमानच्या नग्न शरीरात काही वाटत नाही. पण राधीका आपटे टॉपलेस झाली तर ती कॅरेक्टरलेसच आहे अशी त्यांची खात्रीच असते. मग लगेच यांचा धर्म, यांची संस्कृती संकटात सापडते, जगबुडी होण्याचा धोका निर्माण होतो आणि त्यांतून वाचण्यासाठी राधिकाचा कडाडून विरोध केला जातो. तिला व्यक्ती म्हणून आपण मान देत नाही, तिचा ती व्यक्ती आहे व तिच्या जगण्याचे निर्णय घेण्यास ती स्वतंत्र आहे हे आपण मान्य करत नाही याचा आपल्याला विसर पडतो. अगदी सोयीस्करपणे. पण त्याचवेळी अश्लिल समजले जाणारे चित्रपट बघण्यात हेच विरोधक आणि इतर सर्व सामील असतात. तिथं त्यांना त्या स्त्रियांचे नग्न देह पाहण्यांत काही वाटत नाही कारण त्या तशाच असतात असा त्यांचा ठाम समज असतो. इथं त्यांना आपण केवळ लैंगिक वस्तू मानतो हेही त्यांच्या ध्यानात येत नाही. त्या स्त्रियांना काहीच भावभावना नसतात, त्यांच्यात माणूसकीच नसते असा आपला समज असतो का?

एकाच गोष्टींबाबत अशा विरोधाभासी भूमिका घेण्यामागे आपल्या सर्वांची चूकीची मानसिकता कारणीभूत आहे. जी आपल्याला सांगते की स्त्रिया या व्यक्ती नाहीत, स्त्रिया या पुरुषांपेक्षा खालच्या दर्जाच्या आहेत, स्त्रीनं कायम पुरुषांच्या अधीनच असावं, त्यांचच ऐकावं, लैंगिकता ही वाईट आहे इत्यादी इत्यादी. या दूषित मानसिकतेतून बाहेर पडायचं असेल तर दोन गोष्टी आपल्या सर्वांना कराव्या लागतील, स्त्रियांना आणि मुख्यत्वे पुरुषांना. पहिली म्हणजे आपण व्यक्ती आहोत आणि प्रत्येकाला एक वेगळं आणि स्वतंत्र व्यक्तीमत्त्व असतं हे मान्य करणं आणि त्याचा आदर करणं. दुसरी म्हणजे लैंगिकता ही वाईट गोष्ट आहे ही मानसिकता बदलणं. व्यक्ती म्हणून स्वतःचा आणि इतरांचा स्वीकार करणं म्हणजे त्यांच्याकडे स्त्री किंवा पुरुष असा लिंगभेद न करता बघणं. त्यांना त्यांच्या आयुष्याचे निर्णय घेण्याचे अधिकार आहेत हे मान्य करणं. ते बरे-वाईट असतील पण त्यासाठी ते जबाबदार असतील इतरांनी त्यात मर्यादेपेक्षा जास्त ढवळाढवळ न करणं. एकदा तुम्ही हे मान्य केलं की मग तुम्ही राधिका आपटे किंवा सलमान खान यांच्याकडे स्त्री आणि पुरुष म्हणून बघत नाही तर व्यक्ती म्हणून बघता आणि त्यांना त्यांच्या आयुष्याचे निर्णय घेण्याचे अधिकार आहेत हेही मान्य करता. ते जे करत आहेत ते त्यांच्या इच्छेनं करत आहेत हेही मान्य करता. मग त्यांत त्यांच्या देहाचं वस्तुकरण होत आहे असं म्हणण्याचा प्रश्न येत नाही. यात अपवाद आहेतच. जिथे जबरदस्ती असते तिथे. आणि तिथे त्यांचा विरोध करायलाच हवा आणि त्यासाठी सक्षम यंत्रणा व कायदेही या देशांत आहेतच.

दुसरी गोष्ट म्हणजे लैंगिकतेसंबंधीची आपलीं मतं बदलणं अत्यंत गरजेचं आहे. आपली ही मतं अत्यंत बुरसटलेली, अत्यंत प्रतिगामी आणि कालविसंगत आहेत. स्वतःचं शरीर सुंदर असणं यात वाईट काय आहे? तसं ते करण्यासाठी

प्रयत्न करणं वाईट नाही, असंच बहुतेकांचं उत्तर येईल. सुंदर शरीर मिळणं ही निसर्गदत्त गोष्ट आहे पण ती टिकवण्यासाठी मात्र फार परिश्रम घ्यावे लागतात. मूळात पिळदार शरीर नसेल तर तसं ते बनवण्यासाठी तासनतास व्यायाम करावा लागतो. ही सोपी गोष्टी नाही. मग या शरीराचा अभिमान बाळगत त्याचं प्रदर्शन जर कोणी करत असेल तर त्यात इतरांना असूया होण्याचा प्रश्न कुठे येतो? त्यातही पुन्हा पुरुषांवर कौतुकाची उधळणी आणि स्त्रियांना मात्र शिव्याशाप असा दुजाभाव का? स्त्रीच्या नग्न शरीरात वाईट काय आहे? पुरुषानं आपली छाती दाखवली तर अन्य पुरुषांना जसा जोम चढतो आणि त्याच्यासारखी छाती बनवण्याची इच्छा तयार होते त्याचवेळी स्त्रियांना आपल्याला असा पिळदार शरीराचा पुरुष हवा आहे असं वाटलं तर त्यात वाईट काय आहे? एखाद्या स्त्रीनं आपले भरदार स्तन दाखवले तर तसे स्तन आपल्यालाही हवेत असं वाटणा-या जशा स्त्रिया असतात तसंच अशी स्त्री आपल्या सहवासात यावी असं पुरुषांना वाटलं तर त्यांत अनैसर्गिक काय आहे? आपण आपल्या मूलभूत नैसर्गिक भावना दाबून टाकतो आणि काहीतरी मूर्खपणाच्या कल्पना घेऊन जगतो. या दबलेल्या भावना ज्या आधी निखळ सुंदर नैसर्गिक असतात त्या दाबल्या गेल्यामुळे विकृत होतात, आपल्या दमनासाठी मग त्या कोणाचाही बळी घ्यायला मागेपुढे पहात नाही. हे टाळायचं असेल तर या भावनांचा आदर करायला हवा. लैंगिकता वाईट हा गैरसमज मनातून निपटून काढायला हवा. शरीर मुक्त असेल तर मनदेखील मुक्त होईल. शरीर बंधनात असेल तर मनदेखील विकृतीच्या कारागारात कायमचं सडत राहिल. जर आपल्याला सामर्थ्यवान व्यक्तिंचा कर्तृत्ववान समाज बनवायचा असेल तर हे टाळायलाच हवं.

***



## 7. स्त्री  देहाची शोकांतिका – वेश्याव्यवसाय

स्त्री देहाची शोकांतिका या आपल्या चर्चेतील आजचा भाग वेश्या व्यवसायाबाबतीत आहे. वेश्या व्यवसाय हा जगातील प्राचीन व्यवसायांपैकी एक व्यवसाय आहे ज्यात कधीच मंदी नसते. या व्यवसायाबाबत लोकांच्या धारणा आणि समाजात वेश्यांना असणारं स्थान याविषयी आपण बोलूयात. वेश्या व्यवसाय कोणी आपल्या इच्छेनं करत नाही असं म्हटलं जातं. बाईची फसवणूक करून तिला या व्यवसायात ढकललं जातं आणि मग आधी अनिच्छेनं आणि नंतर सवयीनं म्हणा की निरूपाय म्हणून ती या व्यवसायात राहते. काही जणी उघडपणे हा व्यवसाय करतात तर काही जणी छुप्या पद्धतीनं. पैसा मिळवणे हा उद्देशही अनेकींना यात जायला भाग पाडतो. त्यांना त्यांच्या घरच्यांसाठी हा पैसा कमवायचा असतो आणि तथाकथित सभ्य नोक-या मिळणं त्यांना जेव्हा शक्य

**होत नाही तेव्हा शेवटचा उपाय म्हणून बाया या व्यवसायात येतात. फसवणूक असो, निरुपाय असो, या बाया हा व्यवसाय करतात हे सत्य आहे. प्रत्येक शहरांत गावांत त्यांच्या खास जागा असतात ज्याची माहिती बहुतेक सर्वंच पुरुषांना असते आणि नसली तरी बाकीचे उत्साही लोक ती करून देतात. या सर्वांकडे आपण एक अटळ अशी शोकांतिका किंवा पाप म्हणून पाहू शकतो. मी त्याला व्यवसाय म्हणून पाहतो. माझं हे विधान अनेकांना धक्कादायक वाटू शकेल पण त्याची कारणं मी पुढे देणारच आहे. तोच आपल्या चर्चेचा विषय आहे.**

तुम्हाला जर चांगले बदल करायचे असतील तर पहिली गोष्ट म्हणजे जगात काही वाईट गोष्टी आहेत याचा स्वीकार करणं आणि दुसरी गोष्ट म्हणजे तुम्ही जग बदलू शकत नाही हे मान्य करणं. तुम्ही फारतर तुम्हाला स्वतःला आणि झालंच तर मग आसपासच्या काही लोकांना बदलू शकता. काही प्रमाणात परिस्थितीही बदलू शकता. पण पूर्णपणे कधीच नाही. अशा ज्या काही अटळ परिस्थिती आहेत त्यापैकी वेश्या व्यवसाय एक आहे. तो माणसांच्या सुरूवातीपासून होता, आजही आहे आणि यापुढेही राहील जोवर माणसं आहेत. हे जगच नष्ट झालं तर किंवा स्त्रीपुरुष दोघांचीही लैंगिक वासनाच संपली तरच हा व्यवसाय संपुष्टात येईल अन्यथा नाही. एकदा हे मान्य केलं की मग आपण या गोष्टीकडे व्यावहारीक दृष्टीनं पाहू शकतो. इथं सामाजिक व मानवी दृष्टीकोन नंतर येतो. कारण हा शेवटी व्यवसाय आहे. आपण हे मान्य करायलाच हवं की यात पैशांची उलाढाल होते, यावर अनेकांची पोटं अवलंबून आहेत. यावर विरोधाचा स्वर येईलच की हा काही इतकाही मोठा व्यवसाय नाही की जो बंद केला तर फार नुकसान होईल. त्यांना अन्यत्र कामं देता येतील. त्यांचं पूनर्वसन करता येईल. नक्की करता येईल. पण मग विचार करा की हे आजवर का घडलं नाही. त्याचं कारण आपल्या सामाजिक धारणांमध्ये आणि माणसांच्या मूलभूत गरजांपैकी एक असलेल्या मैथुन या गरजेत दडलं आहे.

मैथुन ही स्त्रीपुरुषांची नैसर्गिक गरज आहे. पण आपल्या समाजात लैंगिक भावनांकडे मोकळेपणानं पाहणं आपण कधीच बंद केलंय. कधीकाळी या देशांत मुक्त लैंगिक व्यवस्था होती, स्त्रियांना आपल्या लैंगिक गरजांची पूर्ती करण्यावर बंधने नव्हती. पुरुषांनाही आपल्या इच्छा बोलून दाखवता येत असत. लैंगिकता ही हीन निषिद्‍ध गोष्ट नव्हती. त्याविषयी विपूल साहित्य उपलब्ध होतं. काळाच्या ओघांत लैंगिकता ही लज्जेची बाब मानली जाऊ लागली आणि तिच्यावर सामाजिक बंधनं टाकण्यात येऊ लागली. परिणामी लैंगिक भावनांचं दमन होऊ लागलं, त्यांच्या शमनाचे उपाय मग शोधण्यात येऊ लागले. त्यापैकी एक होता बळजबरीचा उपाय आणि दुसरा होता राजीखुशीचा व्यवहार. पैसे द्‍या आणि उपभोग घ्या. वेश्या व्यवसाय कसा जन्माला आला, त्यात सामाजिक हीनता किती आहे याची चर्चा आता करण्यांत अर्थ नाही. ते सारं करून झालं आहे. हा व्यवसाय नष्ट होणार नाही हे निश्चित कारण आपली सामाजिक परिस्थिती ही मुक्त लैंगिकतेला बाधक आहे. ती ना पुरुषांच्या लैंगिक गरजेचा विचार करते ना स्त्रियांच्या. स्त्रियांची जी उपासमार होते त्याची कल्पनाही करता येत नाही. पुरुषांना निदान काही मार्ग तरी उपलब्ध आहेत. उद्‍या जर वेश्या व्यवसायही बंद झाले तर जो अनाचार माजेल तो भयानक असेल. हे टाळायचं असेल तर दोन मार्ग आहेत. पहिला आपल्या समाजाची व लोकांची लैंगिकतेविषयीची मानसिकता व धारणा बदलणे. ते अर्थात सहजसाध्य नाही. निदान सध्या तरी ते होईल असं वाटत नाही. याचा अर्थ आपण तसे प्रयत्न करणं सोडावेत असं काही नाही. पण ते करतानाच दुसरा जो मार्ग आहे आणि जो अधिक व्यवहारी आहे त्याकडे आपण लक्ष द्‍यायला हवं. तो आहे वेश्या व्यवसायाला कायदेशीर मान्यता देण्याचा.

वेश्या व्यवसाय कायदेशीर करून वेश्यांची सध्याची जी परिस्थिती आहे त्यात अधिक सुधारणा करणं याविषयी सध्या आपल्या इथे बरेच लोक, संस्था काम

करत आहेत. या व्यवसायाला कायदेशीर मान्यता मिळावी म्हणून कोलकात्याची सोनागाछी ही वेश्या वसाहत जी आशिया खंडातील सर्वांत मोठी वेश्या वसाहत आहे, काही वर्षांपासून यासाठी प्रयत्न करत आहे. त्यांचे मुद्दे विचार करण्यासारखे आहेत. पहिला आणि मुख्य मुद्दा म्हणजे हा फक्त व्यवसाय आहे. ग्राहक पैसे देतात त्याबदल्यात त्यांना काही काळासाठी आमचं शरीर आम्ही देतो. त्यानंतर त्यांचा आमचा संबंध संपतो. ग्राहकाला पुन्हा गरज भासली तर तो पुन्हा येतो पैसा देतो व त्याला हवा तो शरीर नावाचा माल निवडतो. आम्हाला यात काही गैर वाटत नाही. ग्राहकांना गैर वाटत नाही. मग कायद्याला यात काय अडचण आहे? आमची यात भावनिक नाही तर व्यावहारीक गुंतवणूक असते. आमच्या शरीराचा वापर करून आम्ही पैसे कमावले तर त्यात वाईट काय?खेळाडू त्यांच्या शरीराचा वापर करीत नाही का? अभिनेते, मॉडेल्स त्यांच्या शरीराचा वापर करत नाही का? ही फक्त त्याच्या पुढची एक पायरी आहे जी दोघांच्याही संमतीने होते. या व्यवसायात प्रत्येकजण नाइलाजानंच येतो असं का वाटतं कोणाला? ती बाई तिच्या इच्छेनंही येऊ शकते. तिला इतर काही काम करता येत नसेल आणि तिला जर स्वतःचा व आपल्या लोकांचा सांभाळ करण्यासाठी पैसा कमवायचा असेल तर तिने हा व्यवसाय निवडला तर त्यात चूक काय?सरकारनं उद्या हा व्यवसाय बंद केला तर ते आमचं पुनर्वसन कसं करणार? समाज आमचा स्वीकार करणार का? आणि आम्हाला जर हाच व्यवसाय करायचा असेल तर त्यात तुमची आडकाठी का? आम्ही सज्ञान आहोत आणि आम्हाला घटनेनं हवं ते काम करण्याचा अधिकार दिला आहे तर कायदा आम्हाला का अडवतो? या प्रश्नांची उत्तरं सर्वांनीच शोधण्याची गरज आहे. ती शोधली जात आहेत.

वेश्या व्यवसायाला कायदेशीर करणं याचा अर्थ त्याला व्यवसायाचे नियम लावणं असा होतो. तिथे मग काम करणा-या कर्मचा-यांना त्यांचे कायदेशीर अधिकारही मिळतील. त्यांच्यावरच्या अत्याचारांविरोधात त्यांना न्यायालयांत दाद मागता

येईल, त्यांना अन्य सुविधा मिळतील. हे कदाचित वाचायला एखाद्याला भीषण वाटू शकेल पण जरा विचार करा की आपल्या दांभीकतेमुळे यांचं जितकं नुकसान होतंय त्यापेक्षा कितीतरी जास्त फायदा त्यांना कायद्याचं संरक्षण देण्यानं होईल. तेव्हा मग अल्पवयीन मुलींना या व्यवसायात आणता येणार नाही. वेश्यांच्या आरोग्याची काळजी घेता येईल. त्यांना व्यवस्थित पगार देता येईल. किती काळ काम करावं यांचे नियम येतील. त्यांना अन्यायाविरोधात पोलिसांत तक्रार करता येईल. ग्राहकांना काही नियम बांधून देता येईल ज्याचं त्यांना पालन करावं लागेल. केवळ पैसा देत आहेत आणि त्या वेश्या आहेत म्हणजे त्या माणसं नाहीत या भावनेतून त्यांच्यावर जे अत्याचार केले जातात त्याला आळा बसेल. एक स्त्री म्हणून तिच्या सन्मानाचं रक्षण होईल. तिला तिच्या भावना व अधिकार यांची जागरुकता येईल. वेश्येवर बलात्कार कसा काय होऊ शकतो असले घृणास्पद आणि माणूसकीहीन प्रश्न विचारणा-यांना आळा बसेल. वेश्यांच्या मुलांना शिकण्याची संधी मिळेल. त्यांच्या मुलांना समाजात वावरता येईल. त्यांच्या मुलींना अधिक चांगलं जीवन जगण्याचा पर्याय मिळेल.

दुसरा भाग आहे त्यांना सामाजिक व मानवीय सन्मान देण्याचा. तुम्ही जर निखळ माणूसकी मानता असा जर तुमचा समज असेल, स्त्रियांचा तुम्ही सन्मान करता असं जर तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही या वेश्यांना माणूस म्हणून मान द्याल, अन्य स्त्रियांना देता तसाच सन्मान त्यांनाही द्याल. ही तुमची कसोटी आहे. वेश्या व्यवसाय करतात म्हणून त्या सर्वकाळ उपलब्ध असतात असं नाही हे समजून घ्यायला हवं. त्यांच्यात एक प्रेयसी दडलेली असते, त्यांनाही लग्न करायचं असतं, त्यांनाही आई व्हायचं असतं आणि त्यांच्या या भावना इतर सामान्य जगणं जगणा-या स्त्रियांपेक्षा वेगळ्या किंवा कमी महत्त्वाच्या नसतात. परिस्थितीमुळे त्यांच्यात आपल्याला न सोसणारा स्वभाव तयार झाला असेल पण त्यांच्या आत एक माणूस दडलेला आहे याचा विसर पडता कामा नये. आपण आधी या गोष्टी

मान्य करूयात आणि मग शक्य झालंच तर त्यांची पुढची पिढी यात येणार नाही यासाठी प्रयत्न करूयात.

***



# 8. एकल माता

**आपल्या अवतीभवती आपण अनेक अशी कुटुंबं पाहतो की जिथे मुलांचा सांभाळ त्यांची आईच करते. वडीलांचं निधन झालेलं असतं किंवा त्यांनी घटस्फोट घेतलेला असतो किंवा पळून गेलेले असतात. ब-याच ठिकाणी नवरा असूनही त्याचा बायकोला व मुलांना उपयोग नसतो. तो व्यसनी असतो, गुन्हेगार असतो, बेरोजगार असतो किंवा आजारी असतो आणि त्याचं घरात कधीच लक्ष नसतं. अशा सर्वंच ठिकाणी घरातली बाईच घर सांभाळत असते. आपण यांना एकल माता म्हणू शकतो. पण मी ज्या एकल मातांविषयी इथं बोलणार आहे त्या यांच्यापेक्षा वेगळ्या आहेत. या त्या स्त्रिया आहेत ज्यांनी लग्न केलेलं नाही पण मुल दत्तक घेतलं तरी आहे किंवा कोणाकडून तरी स्वतःला करवून घेतलं आहे. त्या**

**मुलाचा पिता कोण आहे हे त्यांनी जाहिर केलेलं नाही. अगदी जाणीवपूर्वक त्यांनी हा निर्णय घेतला आहे. आपण या एकल मातांविषयी बोलणार आहोत.**

आपल्या प्राचीन इतिहासांत याचे दाखले आहेतच. सत्यकाम जाबाली हे त्यांतील एक प्रसिद्ध उदाहरण. सत्यकाम त्याच्या आईच्या जबालाच्या नावावरूनच ओळखला जातो. त्याच्या वडीलांची त्याला माहिती नव्हती. त्यानं त्याची तमा बाळगली नाही की तेव्हाच्या समाजानंही त्याचा अस्विकार केला नाही. पूर्वी अशी प्रथा होती की स्त्री रजस्वला झाली म्हणजे ती वयात आली की ऋतूस्त्रावाच्या या काळात ती कोणाही आवडीच्या पुरुषाला संभोगदान मागू शकायची. तिचा ऋतूस्त्राव वाया जाऊ नये ही त्यामागची भूमिका होती. अर्थात लोकसंख्या वाढावी हा हेतूही त्यामागे असेल हे उघडच आहे. ती प्रथा नंतरच्या काळात बंद पडली. पण आईच्या नावावरून मुलांची ओळख होणं बंद झालं नाही. महाभारतात कुंतीनं संभोगदान मागून पुत्र मिळवले ते कौंतेय म्हणून ओळखले गेले. पण त्यांना समाजमान्यता मिळण्यासाठी पांडव म्हणून ओळख द्यावी लागली. एकल मातांची फरफट त्यानंतरच्या काळात झपाट्यानं होत गेली. ती प्रथाच बंद पडली. बिन बापाचं पोर सांभाळण्याचा अधिकारही तिला राहिला नाही. शक्यतो इतरांच्या आश्रयानंच तिला आपली मुलं सांभाळावी लागली. मग जाणीवपूर्वक लग्न न करताच मातृत्वाचं सुख घेण्यासाठी एकतर दत्तक मुल घेणं किंवा त्याहीपेक्षा कोणाकडून तरी गर्भधारणा करून घेत त्या मुलाला जन्म देऊन त्याचा सांभाळ करणं ही अतिशय धाडसाची गोष्ट आहे. कारण आपल्या समाजाच्या व लोकांच्या मानसिकतेत या गोष्टी न बसणा-या आहेत. त्या धर्मविरोधी समाजसंस्कृती विरोधी मानल्या जातात. नीना गुप्ता यांनी व्हिव रिचर्डसन यांच्याकडून मातृत्वाचं सुख मिळवलं आणि आपल्या मुलीला एकट्यानंच मोठं केलं. सुषमा सेन यांनीही मुलगी दत्तक घेतली, त्यांनी लग्न नाही केलं.

मुलासाठी लग्न करण्याची गरज नाही हा यातला पहिला मुद्दा. एखाद्या स्त्रीला, जी सक्षम आहे, तीनं जर असा निर्णय घेतला की मला लग्नाच्या भानगडीत पडायचं नाही पण मला मुल हवंय आणि त्याचा सांभाळ करण्यास मी सक्षम आहे तर यात समाजानं विरोध करण्यासारखं काय आहे? यात तत्त्वतः चूकीचं काहीच नाही. पण समाज आणि सर्व साधारण लोक यांच्या पचनी मात्र ही गोष्ट पडणार नाही. कायदादेखील अशा एकल मातांच्या बाजूनं  उभा राहत नाही. तो अगदीच विरोधात जातो असंही नाही. पण आपल्या इथे वडीलांच्या नावाशिवाय कोणतीही कागदपत्रं बनली जात नाहीत तिथे या एकल मातांच्या मुलांना त्रास होणार हे निश्चित. आत्ता कुठे आपण आईच्या नावाला महत्त्व देतोय पण फक्त तिच्या नावावरूनच मुलांना दाखले सहजपणे मिळायला अजून बराच काळ जावा लागेल . या माध्यमातून आपण त्यासाठी आवाहन करूया .

कायदा एकवेळ बदलेलही पण समाजाची मानसिकता बदलणं ही खूप कठीण गोष्ट असते. त्यासाठी आपल्यालाच पुढाकार घ्यावा लागेल. एक स्त्री ही एक व्यक्ती आधी असते. ती जर आपल्या पायावर समर्थपणे उभी असेल, मानसिक व शारिरिकदृष्ट्या स्वतःचा व आपल्या मुलांचा सांभाळ करण्यास समर्थ असेल तर तिनं आपल्याला मूल कसं हवंय व कोणत्या परिस्थितीत हवं याचा निर्णय घेण्यास ती स्वतंत्र आहे. इथं शारिरीकदृष्ट्या समर्थ असणे याचा अर्थ अपंग व्यक्ती तशा नसतात असा नाही. अंध, व्यंग असलेल्या व्यक्तीही आपल्या मुलांचा उत्तमपणे सांभाळ करू शकतात. शारिरीक असमर्थता म्हणजे जे स्वतःचाही सांभाळ करण्यास पूर्णपणे असमर्थ आहेत असे लोक. व्यसनी लोकांचाही यात समावेश होतो. मातृत्वाची आस जर कोणा स्त्रीला लागली असेल तर तो तिचा मूलभूत अधिकार आहे ज्याची पूर्तता ती तिला हव्या त्या पद्धतीनं करण्यास स्वतंत्र आहे. त्यासाठी लग्न करायला हवं ही अट चूकीची आहे. किंवा तिचं लग्नही झालेलं नाही

आणि ती माताही होऊ शकत नाही याचा अर्थ ती मुल सांभाळण्यास असमर्थ आहे असा घेणे हाही तिच्यावर अन्यायच आहे.

हे झालं तिच्या मातृत्वाच्या अधिकारांविषयी. पण एकदा ती अशी एकल माता झाल्यावर समाजाचा तिच्याकडे बघण्याचा जो दृष्टीकोन असतो त्याच्यातही बदल होणं गरजेचं आहे. विशेषतः पुरुषांच्या दृष्टीकोनात. एकटी बाई आहे, तिच्यासोबत कोणी पुरूष नाही याचा अर्थ ती उपलब्ध आहे असा होत नाही. याचा अर्थ आपलं मुल वाढवण्यासाठी तिला पुरुषाची गरज आहे असा होत नाही. विशेषतः या मदतीच्या नावाखाली अनेक पुरुषांना आपले छुपे हेतू पूर्ण करायची संधी मिळू शकते असाही समज होतो. शिवाय हेही की तीनं आपली मदत घ्यावी इतर पुरुषाची घेऊ नये किंवा तिनं आपल्याला नाकारलं तर तिनं अन्य पुरुषांनाही नाकारायलाच हवं, तिला अन्य पुरुषांसोबत वागण्याबोलण्याचा अधिकार नाही असाही याचा अर्थ होत नाही. तिनं कोणाला जवळ करायचं की नाही, याचा निर्णय घेण्याचा अधिकार फक्त तिलाच आहे. तिनं लग्न करून मिळणारा आपला हक्काचा पुरुष नाकारला म्हणून आपल्या पुरुष मित्रांनाही नाकारायचं असा याचा अर्थ होत नाही. किंवा तिनं पुरुष नाकारला ना मग आता आम्ही तिला कोणतीही मदत करणार नाही असा पवित्रा जर तिच्या सानिध्यातले अन्य पुरुष घेत असतील तर तेही चूकीचं ठरेल. या सर्व गोष्टी आधी पचणं आणि नंतर त्यानुसार वागणं ही आजच्या काळातील पुरुषांसाठीही थोडी अवघड गोष्ट आहे यात शंका नाही. पण सध्याचं वातावरण लक्षांत घेता आपण अशी आशा नक्की करू शकतो की अशा विचारांचे पुरुष एकदमच दूर्मिळ नाहीत.

आणि हे केवळ एकल मातांबाबतच नाही तर एकल पित्यांबाबतही लागू पडतं. समलिंगी माता पित्यांबाबतही लागू पडतं. कारण आपल्याला मुल हवं असणं ही एक निखळ नैसर्गिक भावना आहे ज्यात काहीच गैर नाही. काही अपवाद

असतीलही पण तो त्यांचा निर्णय आहे त्यामुळे त्याचाही आदर करायलाच हवा. पण एरव्ही मला जर मुल हवं असेल तर त्यासाठी लग्नच करावं लागेल किंवा भिन्नलिंगी व्यक्तीसोबतच मला मुल होऊ देण्याचा अधिकार मिळेल असं समजणं हे आपल्या व्यक्तीस्वातंत्र्याचा संकोच करण्यासारखं आहे. यामुळे लग्न संस्था व कौटुंबिक संस्था उध्वस्त होईल असा आक्षेप अनेक लोक घेतील. हा धोका असला तरी अशा गोष्टी या नेहमीची अपवाद म्हणून समाजात असतील. त्यांचं नियमात रुपांतर होणार नाही. दुसरं असं की अशी एकल कुटुंबं पूर्णपणे एकटी असतात असं नसतं. त्यांच्या आसपास त्यांच्या नात्यातले मैत्रितले प्रेमातले लोक हे वावरतच असतात. आज आत्ताच एकदम टोकाचा विचार करण्याची आवश्यकता यात आहे असं नाही. तसा प्रसंग उद्‌भवलाच तर त्यावर तेव्हा काहीतरी उपाय निश्चित आपल्याला काढता येईल पण भविष्यात होणा-या एखाद्या जवळपास अशक्य गोष्टीचा विचार करून आत्ता काही लोकांनी घेतलेल्या निर्णयाचा अनादर करणं, त्यांना परवानगी नाकारणं अन्यायकारक ठरेल. आपण आशा करूयात की या व्यासपीठावरून या विषयाला व अशा सर्व एकल माता, पित्यांना कायमच आपला पाठींबा असेल.

***



## 9. मासिक पाळी – स्त्रियांचा बळी

'लव्ह फिक्शन'नावाच्या कोरियन चित्रपटांत एक प्रसंग आहे. त्यातली नायिका काही कारणानं नायकावर चिडते आणि तो तथाकथित समजूतदार पुरुषाप्रमाणे, तिची मासिक पाळी चालू आहे त्यामुळे ही चिडचीड होत आहे असं तिला समजावतो. त्यावर ती भडकून उत्तर देते की, "तुम्हा पुरुषांना काय वाटतं आमचा मेंदू आमच्या अंडाशयात असतो? आमच्या चिडण्यामागे दुसरं काही कारणच नसतं का?"तो स्वतःला समजूतदार समजणारा नायक या प्रश्नानं निरुत्तर होतो. आपल्यातील जवळपास सर्वच तथाकथित स्त्रीवादी व समजूतदार पुरुषांनाही नेमकं असंच वाटत असतं. स्त्रियांना समजून घेण्यासाठी काही पुरुष आता पुढे सरसावत आहेत ही चांगलीच गोष्ट आहे पण त्याचवेळी त्यांच्या तसेच अन्य

**अज्ञानी अहंकारी मनांतील या व अन्य काही मिथ्स दूर होणंही तितकंच गरजेचं आहे. केवळ त्यांच्याच मनातील नाही तर स्त्रियांच्या मनातीलही. त्याविषयी आपण या लेखांत आपण चर्चा करणार आहोत.**

जगभरात सर्वत्रच मासिक पाळी हा ज्याविषयी बोलू नये असा विषय मानला जातो. मासिक पाळीमुळे स्त्रिया अपवित्र होतात, म्हणून स्त्रिया पापी असतात, त्यांना त्या काळात सगळ्यांपासून दूर ठेवावं, या संदर्भातल्या अनेक गोष्टी सर्वंच धर्मांत सर्वंच देशांत फार प्राचीन काळापासून प्रचलीत आहेत. मासिक पाळीच्या संदर्भात हिंदू संस्कृतीत जी दंतकथा येते तिचा संबंध आहे इंद्रानं केलेल्या वृत्रासुराच्या वधाशी. वृत्रासूर हा ब्राह्मण असल्याने इंद्राला ब्रह्महत्येचं पाप लागलं. त्यांतून वाचण्यासाठी त्यानं ते पाप अनेकांना वाटून दिलं. त्यासाठी त्यानं कोणाला काय लालूच दिली त्याची कल्पन नाही पण या वाटेक-यांमध्ये स्त्रीचाही समावेश होता. परिणामी तिला मासिक पाळी सुरू झाली. हे पाप असल्यानं ती स्त्रीही पापी ठरली आणि नंतरच्या काळात तिच्यावर शेकडो बंधनं घालण्यात येऊन तिचं व्यवस्थितपणे खच्चीकरण करण्यात आलं. वध केला इंद्रानं, जीव गेला वृत्रासुराचा आणि त्यापायी स्त्रिया मात्र हजारो वर्षांपासून अवहेलना झेलत जगत आहेत. बरं हा इंद्र खूप मोठा पुण्यात्मा होता

असंही नव्हतं. इतरांच्या आवडलेल्या बायकांवर बलात्कार करणं हा त्याचा छंद. त्यापायी त्यानं अनेकांचे शाप घेतले. पण दरवेळी उःशापही मिळवले कारण तो पुरुष. गौतम ऋषीची पत्नी अहिल्या हिच्यावरही त्यानं बलात्कार केला तो गौतम ऋषीचं रुप घेऊन. त्यात अहिल्येची काही एक चुक नसताना आणि ती संशयानं विरोध करत असतानाही इंद्रानं तिच्यावर बलात्कार केलाच. त्याची शिक्षा मात्र अहिल्येलाही मिळाली आणि तिला एकांतात शिलावत जगणं जगावं लागलं. तिचा उद्धार पुन्हा एका पुरुषाकडूनच झाला. अहिल्येला पुन्हा कधी पूर्वीची प्रतिष्ठा मात्र मिळाली नाही. पुरुष स्त्रियांवर कसे अन्याय करतात त्याचं हे एक बोलकं उदाहरण.

मासिक पाळीच्या संदर्भातही याच मिथकामुळे नंतरच्या काळात पुरुषांनी कायमच स्त्रियांना आपल्या वर्चस्वाखाली ठेवलं. त्यासाठी त्यांनी नवनवीन कारणं शोधून काढली आणि स्त्रियांच्या मनावर पक्की बिंबवली. नंतरच्या काळात पुरुषांनीही कोणतीही चिकित्सा किंवा ख-या खोट्याची शहानिशा न करता त्या परंपरा चालू ठेवल्या. त्याचा अभिमान बाळगला. त्यासाठी स्त्रियांचा बळी दिला. एका निव्वळ नैसर्गिक घटनेसाठी, मासिक पाळीसाठी.

मासिक पाळीच्या संदर्भातील या मिथ्स जगभर एकसारख्याच आहेत. मासिक पाळीत स्त्री अपवित्र होते, त्यामुळे तिनं पुजा करू नये, मंदिरात जाऊ नये, नद्यातलावांमध्ये आंघोळ करू नये, स्वयंपाक करू नये, जेवणाला स्पर्श करू नये, तिथं आसपासही असू नये कारण त्यामुळे अन्न विषारी बनतं, तिनं एकांतवास करावा, इत्यादी इत्यादी. या धार्मिक समजूतींच्या सोबतीलाच सामाजिक समजूतीही आहेत. मासिक पाळीत केस धुवू नयेत, गरम पाण्यानं आंघोळ करू नये, मासिक पाळीतील रक्त अशुद्ध असतं, तिनं आंबट काही खाऊ नये त्यामुळे मासिक पाळी बिघडते इत्यादी. या रक्तामुळे दुष्ट आत्मे आकृष्ट होतात, या रक्ताचा उपयोग करून स्त्रिया पुरुषांना वश करतात अशाही समजूती अगदी आजही कायम आहेत.

पण त्या ख-या आहेत का याचा विचार मात्र कधी केला गेला नाही. आता तो केला जात असला तरी एकूणच आपले मंदबुद्धी पुरुष आणि मासिक पाळीपायी भोगावी लागणारी लज्जा यांमुळे खचलेल्या स्त्रिया या दोघांनाही आपल्या या समजूती बदलणं अजूनही कठीणच जात आहे. पुरुषांपेक्षा स्त्रियांच्याच मनात मासिक पाळीविषयीच्या इतक्या चुकीच्या कल्पना असतात आणि त्यावरील समजूतींवर त्यांचा इतका गाढ विश्वास असतो की त्याच ही परंपरा आपल्या मुलींच्या बाबतीतही तशीच चालू ठेवतात. यातील सर्वांत ठाम समजूत असते मासिक

पाळीमुळे स्त्री अपवित्र होते ही. विज्ञान असं सांगतं की स्त्री वयात आली की दर महिन्याला तिच्या अंडाशयात एक प्रजननक्षम स्त्रीअंडं विकसीत होत असतं. संभाव्य गर्भाच्या रक्षणासाठी त्याच्याभोवती गर्भाशय अस्तरही तयार होतं. पुढच्या महिनाभरांत जर त्याचं फलन झालं नाही तर ते अंडं नष्ट होतं आणि त्यासोबतच गर्भाशय अस्तरही. ही सारी मासिक पाळीच्या चार दिवसांत रक्तावाटे वाहून जातात. त्याच्या जागी पुन्हा नवं गर्भाशय़ अस्तर तयार होऊ लागतं. जर मूळात शरीरातील ही तथाकथित अशुद्धी बाहेर पडत असेल तर शरीर शुद्धच होणार ते अशुद्ध कसं राहणार हा पहिला प्रश्न आहे. त्यामुळे स्त्री या काळांत अपवित्र होते ही समजूतच चूकीची आहे. हे रक्त शुद्धच असतं. फक्त त्यात गर्भाशयाचं अस्तरही मिळालेलं असल्यानं त्याचा रंग काळपट दिसतो. दुसरं कारण असं की या काळात महिला मुली आत्यंतिक लज्जेपायी आंघोळही करत नाही किंवा त्यांना ती करूही दिली जात नाही. त्यामुळे आपल्या जननेंद्रियांची स्वच्छता करणं त्यांना शक्य नसतं. त्यामुळे या रक्ताला एरव्हीच्या घामाचा व मूत्राचा वास लागून तसेच जंतूसंसर्ग होऊन दूर्गंधी सुटण्याची शक्यता वाढते. स्त्रिया एरव्हीही आपल्या जननेंद्रियांच्या स्वच्छतेबाबत संकोच करत असतात. पण त्याचे परिणाम त्यांना हे असे भोगावे लागतात. मासिक स्त्रावाच्या अशुद्धीमागचं खरं कारण हे आहे आणि त्याचा फायदा उठवत पुरुषांनी या स्त्रियांना कायमच अपवित्र म्हणून घोषित करून टाकलं. मासिक पाळीत मंदिरात जाऊ नये, पुजा करू नये, एकांतवासात राहावं, कोणाला किंवा कशालाही स्पर्श करु नये असं म्हणणारे लोक, ज्यात स्त्रीपुरुष दोघेही असतात, यासाठी या अशुद्धीचं कारण देतात. पण दिवसभरात आपण संडासला गेलेलो असतो, लघवीला तर येता जाता जातो, अंगातून सारखा घाम वाहत असतो, नाक शिंकरलं जात असतं या देखील शारिरीक अशुद्धीच आहेत जितकी की मासिक पाळीतील रक्तस्त्राव आणि तसं जर असेल तर स्त्रियांनाच मासिक पाळीत वेगळी वागणूक का दिली जाते याचा विचार आता आपण सर्वांची करायची गरज आहे. मुख्य म्हणजे विर्यस्खलन

करणा-या पुरुषांना स्त्रियाच तेवढ्या अशुद्ध अपवित्र असतात असं म्हणायचा अधिकारच काय आहे?

मासिक पाळीचा मुद्दा इतका का महत्त्वाचा आहे असा काहींना प्रश्न पडू शकेल. त्याचं उत्तर शोधायला गेलं तर भयानक परिस्थीती लक्षांत येते. मासिक पाळीशी संबंधीत समजुती, त्याविषयीची लज्जा, मुलांकडून नकळत होणारी अवहेलना, यामुळे वयात येणा-या जवळपास २५ टक्के मुली शाळा सोडून देतात. कामाच्या ठिकाणी वेगळी व पुरेशी चांगली स्वच्छतागृहं नसणं, सॅनिटरी नॅपकिन्स उपलब्ध नसणं, यामुळे कामकरी स्त्रियांना व शिकणा-या मुलींना प्रचंड गैरसोयींना सामोरं जावं लागतं. मासिक पाळी दरम्यान स्वच्छता कशी राखावी याचं अपूरं ज्ञान तसेच पैशांअभावी तब्बल ७० टक्क्यांहून जास्त मुली-महिला जुन्या कपड्यांचा वापर करतात. जे पुन्हा पुन्हा वापरले जातात. काही हे रक्त शोषलं जावं म्हणून राख, वर्तमानपत्रांचे कागद, वाळकी पानं इत्यादिंचा उपयोग करतात. शिवाय या काळात आंघोळही केली जात नाही. परिणामी जंतू संसर्गाचा धोकाही वाढतो. तसेच रक्ताला घाण वासही येतो ज्यामुळे पुन्हा त्यांच्या समजूती बळकट होतात. यामुळे जसे शारिरिक आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात तसेच मानसिक तणाव जो वाढतो तो पुढे वाढतच राहतो. या परिस्थीतीमुळे किती मुली अकालीच आपल्या प्रगती करण्यावाचून मुकल्या जात असतील याचा विचार करण्याची आता गरज आहे. कारण ही आपली अर्धी लोकसंख्या आहे. त्यांच्यावरच पुढची पिढी जन्माला घालायची जबाबदारी असते. तिच जर अशी अकाली खच्ची होत असेल तर त्यांतून सुप्रजा निर्माण होण्याची शक्यता कमीच असते. ज्यात पुरुषांचाही समावेश असतो. त्यामुळे आपल्या स्वार्थासाठी का होईना हे मंदबुद्धी पुरुष आपल्या धारणा बदलतील अशी आशा आहे.

ही परिस्थिती बदलायची असेल तर मोठ्या प्रमाणावर सर्वांनीच प्रयत्न करण्याची गरज आहे. त्याची सुरूवात घरातून व्हायला हवी. आईनं मूर्खपणाच्या समजूतींचे दाखले देण्यापेक्षा काय आहे ते स्पष्टपणे आपल्या मुलींना सांगायला हवं. बापानंही याची जबाबदारी उचलायला हवी. मुख्य म्हणजे घरातील मुलांनाही याची माहिति द्यायला हवी. यात कोणतीही लाज बाळगण्याची गरज नाही. या लज्जेपायी या मुलींना पुढे जे काही भोगावं लागतं त्यापुढे ही लाज काहीच नाही. शाळांमधूनही याची माहिती दिली जायला हवी. केवळ मुलींनाच नाही तर मुलांनाही. आणि तीही स्पष्टपणे. उगाच मोघम भाषेत, फालतू उदाहरणं देत, लैंगिक अवयवांची थेट नावं घेण्याचं टाळत बोलण्यानं फायदा कमी आणि नुकसानच जास्त होण्याची शक्यता असते. हा बाष्कळपणा आता तरी संपावा. चांगली व पुरेशा प्रमाणात स्वतंत्र स्वच्छतागृहं मिळणं हा मुलींचा स्त्रियांचा मूलभूत अधिकार माणण्यात यावा. मुलांना पुरुषांनाही मासिक पाळीची माहिती देऊन त्यांच्याशी सन्मानानं वागण्याची शिकवण देण्याची गरज आहे. या विषयावर जितक्या मोकळेपणानं मुलामुलींमध्ये चर्चा होईल तितका त्यातील संकोच गळून पडेल. त्या मागच्या थिल्लर समजूती, बिनबुडाच्या धार्मिक परंपरा आणि अशास्त्रीय अपसमजांना आळा बसेल. मासिक पाळीमुळे स्त्रियांना चिडचीड होते, त्यांना योग्य निर्णय घेता येत नाही, त्यांना त्रास होतो अशी भूक्कड कारणं देत त्यांना काही ठिकाणी कामं करण्यास मनाई केली जाते. हा मूर्खपणा संपुष्टात येण्यासाठी आपण सारेच काम करूयात.

***



## 10. बलात्काराची मानसिकता

**आपल्या समाजात ज्या गोष्टींविषयी उघडपणे बोललं जात नाही त्यातील एक विषय म्हणजे बलात्कार. या लेख मालिकेतली पुढचे काही लेख आपण या विषयावरच बोलणार आहोत. तेही अगदी थेट उघडपणे. कारण यात जितकी लपवाछपवी असेल, कुजबूज असेल, संकोच असेल तितकं आपलंच नुकसान होणार आहे. ते होऊ नये यासाठी हा प्रयत्न. जगात ज्या वाईट गोष्टी घडत असतात त्या आपल्या किंवा आपल्या कुटुंबाबत कधीच घडणार नाही असा एक ठाम गैरसमज आपल्यामध्ये असतो. याला आशावादी वृत्तीही म्हणता येणार नाही. कारण यातून आपण परिस्थितीपासून वास्तवापासून पळ काढतोय असा अर्थ निघतो. या अवांछित वास्तवाचा सामना करायचा असेल तर त्याच्याशी थेट भिडणंच सोयिस्कर ठरतं. असं म्हणतात, की चांगल्याची अपेक्षा करावी पण**

**तयारी वाईटाचीच ठेवावी व त्यासाठी स्वतःलाही तयार ठेवावं. आपल्यावर बलात्कार होणार नाही, आपल्या कुटुंबातील सदस्यावर बलात्कार होणार नाही अशी आशा आपण नक्कीच करावी पण तसं झालंच तर काय करायचं याचा किंवा ते होणं टाळायचं असेल तर काय करावं याचाही विचार आपण करायलाच हवा. कारण दिवस अतिशय वाईट आले आहेत.**

बलात्कार म्हणजे बळाचा वापर करून केलेले कोणतेही शारिरीक अथवा मानसिक कृत्य. पण या शब्दाला आता फक्त लैंगिक अत्याचाराचाच अर्थ मिळाला आहे. आपणही त्याच संदर्भातून याचा विचार करणार आहोत. बलात्कारासंबंधीच्या काही गोष्टी आपण आधी लक्षात ठेवायला हव्यात. या विषयांवर आपण आपल्या घरातील लोकांशी मित्रांशी मोकळेपणानं बोलायला हवं. बलात्कार केवळ शारीरिक नसतात तर मानसिकही असतात. अनोळखी माणसांपेक्षा ओळखीचे लोक, बाहेरच्या लोकांपेक्षा घरातले, शेजारपाजारचे लोक बलात्कार करण्यात पुढे असतात. बलात्कार करताना अत्याचारीत व्यक्तीचं वय हा महत्त्वाचा मुद्दा आता राहिला नाही. त्याचं दिसणं हाही मुद्दा यात नसतो. ब-याचदा लैंगिक भूकेपेक्षा जरब बसवण्यासाठीही बलात्कार केले जातात. बलात्काराची जितकी प्रकरणं उघड होतात त्याच्या दसपट कधीच उघड होत नाहीत. कपडे हे बलात्काराचं कारण नसतं. बलात्कार हे स्त्रियांवर, पुरुषांवरही होतात, लहान मुली आणि लहान मुलांवरही होतात. तरुणांवर होतात आणि म्हाता-यांवरही होतात. घराची अब्रू जाऊ नये म्हणून बरीच प्रकरणं दडपली जातात. समाज अजूनही याबाबतीत असंवेदनशील आहे.

आता वरील सर्व गोष्टींचा विचार करता आपल्याला काय करता येईल याचा विचार आधी करूयात. आधी म्हटलं तसं आपल्याबाबतीत हे घडणार नाही हा समज मनातून काढून टाका आणि हे घडू शकतं या मानसिकतेतून याचा सामना

करण्यासाठी स्वतःला तयार करा. घरातील लहान मुलांना याची जाणीव करून द्या, त्यांना माहिती द्या. त्यांना ब-या-वाईट स्पर्शांची, नजरांची माहिती द्या. अखंड सावध राहा, तुमची एक चूक तुम्हाला महागात पडू शकते. लोकांवर विश्वास ठेवण्याआधी त्यांना पारखून घ्या आणि त्यांनतरही त्यांच्यावर पूर्ण विश्वास कधीच ठेवू नका. असले प्रकार घडणार नाहीत यासाठी कायम काळजी घ्या. तुमचे मित्र कसे आहेत मैत्रिणी कशा आहेत कार्यालयीन सहकारी कसे आहेत तुमच्या संपर्कात येणारे अन्य कोणतेही लोक कसे आहेत याची माहिती घ्या. अकारण धाडस करू नका. नशा करून कधी स्वतःवरचं नियंत्रण गमवू नका. कोणी तुमच्याशी जर चुकीचं वागत असेल तुमची इच्छा नसताना तुमच्याशी असह्य अशी शारिरीक जवळीक साधण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याला वेळीच अटकाव करा. समोरच्याला कोणत्याही बाबतीत कोणत्याही प्रकारे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रोत्साहन देऊ नका. तुमचं मौन तुमचं काहीच न करणं याचा अर्थ तुमची या संबंधांना संमती आहे असाच घेतला जात असतो. ते कधीही होऊ देऊ नका. आपल्या घरच्यांपासून मित्रांपासून अशा गोष्टी लपवून ठेवू नका. यात तुमची चूक नाही त्यामुळे स्वतःला दोष देऊ नका किंवा लाजही बाळगू नका. उघडपणे विरोध करा.

बलात्कार का होतात, पुरुष असे का वागतात याला अनेक कारणं आहेत. त्याला अनेकदा पुरुषही जबाबदार नसतात. त्यांचाही दोष नसतो. पण यानं वास्तव बदलत नाही. आणि वास्तव हे आहे की पुरुष स्त्रियांवर बलात्कार करत आले आहेत, करत आहेत आणि यापुढेही करतच राहतील. केवळ कठोर शिक्षा देऊन हा प्रश्न सुटणार नाही. हा प्रश्न कायमच असणार आहे. आपल्याला याचं उत्तर बदलावं लागणार आहे. बलात्काराकडे बघण्याचा आपला दृष्टीकोन आपल्याला बदलावा लागणार आहे. आपली मानसिकता बदलावी लागणार आहे. स्त्रीचं चारित्र्य तिच्या योनीत असतं ही मूर्खपणाची समजूत बदलावी लागणार आहे. तिच्यावर बलात्कार

होणं हा तिचाच दोष आहे, त्यामुळे तिची आणि घराचीही अब्रू मातीस मिळते ही धारणा बदलावी लागणार आहे. स्त्रीवर बलात्कार झाला म्हणजे ती भ्रष्ट झाली, तिचं आयुष्य धूळीस मिळालं हा गैरसमज बदलावा लागणार आहे. बलात्कारीत स्त्रीला कमी लेखणं, तिची लाज बाळगणं, तिचा अपमान करणं, तिला दोषी माणणं हे बदलावं लागणार आहे. स्त्रीच्या चारित्र्याशी निगडीत आपली हीन सामाजिक मानसिकता बदलावी लागणार आहे. बलात्कार होणं म्हणजे आभाळ कोसळणं, स्त्रीला कायमचा कलंक लागणं असं मानणं बदलावं लागणार आहे. हे बदल जेव्हा घडून येतील तेव्हा आपण अधिक परिणामकारकपणे या अत्याचाराच विरोध करू शकतो.

समाज हा स्वतःहून कधीच बदलत नसतो. बदलतात ती माणसं. तीही वैयक्तिक पातळीवर. बलात्काराच्या बाबतीत तर व्यक्तीच्या व समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून आणनं ही खूप अवघड गोष्ट आहे पण अशक्य मात्र नक्कीच नाही. त्यासाठी थोडं धाडस दाखवावं लागेल, स्त्रियांना जास्त धाडस दाखवावं लागेल, पुरुषांना त्याच्या सोबत उभं राहावं लागेल. तरच या समस्येचा आपण सामना करू शकतो. एकाचवेळी विविध आघाड्यांवर आपल्याला हे करावं लागणार आहे. यात स्त्री, पुरुष आणि समाज या प्रत्येकाची भूमिका आहे. या व अन्य गोष्टींबाबत पुढील लेखांत चर्चा करूयात.

***



# 11. बलात्कार आणि स्त्री

**निसर्गानं स्त्री-पुरुषांच्या शरीराची रचना अशी केली आहे की ज्यात पुरुषांना स्त्रियांपेक्षा जास्त फायदा मिळतो. ही पुरुषांना झुकतं माप देण्यारी शारिरीक रचना निसर्गानं माणसाचं पुनरुत्पादन सुरळीत व योग्य प्रमाणात राहावं यासाठी केली आहे. पण कालांतरानं तो मुख्य उद्देश मागे पडला आणि पुरुषांनी आपल्या सुखासाठी या शारिरीक वर्चस्वाचा फायदा घेत स्त्रियांवर अधिकार गाजवायला सुरूवात केली. त्यांतील सर्वाधिक भीषण प्रकार आहे तो लैंगिक अधिकाराचा. जो निव्वळ बळजबरीचा अधिकार आहे. लैंगिक सुख असो वा दुःख असो यात स्त्रियांनाच जास्त त्रास भोगावा लागतो. पुरुष संभोग करून मोकळे होतात पण**

**स्त्रियांना तसं मोकळं होण्याची सोय नाही. गर्भधारणेचा धोका त्यांच्यावर कायमच उलट्या तरवारीसारखा टांगलेला असतो. दरम्यान पुरुष मात्र अन्य स्त्रीसोबत रत होण्यास मोकळा असतो. संभोगानंतर त्याच्यावर कोणतीही जबाबदारी नसते. कोणताही शारिरीक त्रास त्याला सोसावा लागत नाही. कदाचित त्यामुळेच तो लैंगिक सुखांच्या बाबतीत बेजबाबदार आहे किंवा स्त्रियांना होणारे त्रास त्याच्या लक्षातच येत नाही.**

स्त्री ही उपभोग्य आहे ही धारणा फार जुनी आहे. तेवढीच ती असती तरी एकवेळ ते चाललं असतं. याचा अर्थ ती चांगली गोष्ट आहे असा नाही. पण सध्या जे भीषण अत्याचार तिच्या नशीबी येतात त्यामानानं गोष्टी सुसह्य झाल्या असत्या. पण तसं ते झालं नाही कारण स्त्रीच्या नशीबी धार्मिक सांस्कृतिक सामाजिक राजकीय कौटुंबिक अशा सर्व परंपरा चालवण्याची जबाबदारीही सोपवण्यात आली. तिच्या कौमार्याचा योनी शुचितेचा संबंध तिच्या चारित्र्याशी तिच्यावर झालेल्या कौटुंबिक संस्कारांशीही जोडण्यात आला. तिची मानमर्यादा हा पुरुषांनी आपल्या प्रतिष्ठेचा प्रश्न केला कारण त्यात त्या स्त्रीवर असलेला त्यांचा हक्क शाबूत होत होता. या जास्तीच्या बंधनांमुळे स्त्रियांचं जीवन कमालीचं संकुचित झालं. मुख्य म्हणजे त्यांचं लैंगिक स्वातंत्र्य धोक्यात आलं. कारण त्यांचा स्वतःचा त्यांच्या लैंगिक इच्छांवरचा अधिकार समाजानं पर्यायानं पुरुषांनी अमान्य केला होता. आपल्या लैंगिक इच्छांविषयी तिनं काही बोलू नये, लग्न होईतो आपलं कौमार्य जपावं, लग्नानंतर नव-याशिवाय इतरांपासून आपली लैंगिक गरज भागवू नये, तिनं असं काहीही करू नये ज्यामुळे तिचं शरीर इतरांकडून भोगलं जाईल आणि सर्वांत मुख्य म्हणजे यातील सर्व गोष्टींसाठी फक्त ती आणि तीच जबाबदार ठरवण्यात येईल असा अलिखित नियमच बनवला गेला.

या सर्व गोष्टी आता आपल्याला माहिती आहेत. यापुढे मात्र मी अशा गोष्टी सांगणार आहे ज्या आता स्त्रियांनी समजून घेऊन त्यानुसार वागण्याची गरज आहे. बलात्काराबाबतची मानसिकता बदलण्यासाठी त्याचा उपयोग त्यांनी करावा. आपल्या सध्याच्या काळात याची फार गरज आहे. या कामांत स्त्रियांनीच पुढाकार घेण्याची गरज आहे, पुरुषांकडून त्यांनी फार आशा ठेवू नयेत. राजकारणी, समाजाकडून व धर्म रक्षकांकडून तर नाहीच नाही. यातील पहिली गोष्ट म्हणजे बलात्काराची सर्व जबाबदारी ही पुरुषांची आहे. स्त्रीची नाही. तिनं काय कपडे घातले, ती कुठे कोणत्या वेळी एकटी का गेली, तिची वागणूक कशी होती, याचा बलात्काराशी काहीही संबंध नाही. सडक्या मनोवृत्तीचे पुरुष कोणत्याही स्त्रीवर तिचं वय रुप रंग वेळ काळ ठिकाण तिचे कपडे तिची वागणूक या कशाचाही विचार न करता पहिली संधी मिळताच तिचा उपभोग घेण्याचा प्रयत्न करतात. दोष पुरुषांचा आहे. स्त्रीचा नाही. त्यामुळे आपल्यावरील लैंगिक अत्याचारांसाठी कोणत्याही स्त्रीनं स्वतःला दोष देऊ नये, जबाबदार मानू नये, त्यासाठी कुढत बसू नये. बलात्कार हा फक्त एक शारिरीक अपघात आहे असं मानून या कडे बघावं. त्यामुळे त्यांचं चारित्र्य डागाळत नाही की त्यांचं स्त्रीत्वं नष्ट होत नाही. त्यांची योग्यता कमी होत नाही की त्यांचं मनुष्यत्व उणावत नाही. त्यामुळे लाज वाटून घेण्याची, अपमानीत होण्याची व त्यापायी स्वतःला समाजापासून तोंड लपवून एकाकी आयुष्य जगण्याची त्यांना काहीही गरज नाही. हे सर्व त्या बलात्कारी पुरुषानं करण्याची गरज आहे. त्या बलात्कारीत स्त्रीनं नाही.

प्रत्येक स्त्रीनं आपल्यावर होणा-या लैंगिक अत्याचाराविषयी जाहिरपणे विरोधी भूमिका घेण्याची गरज आहे. त्याविषयी ती जितक्या जास्त उघडपणे निर्भिडपणे बोलेल, लढेल तितकं ते तिच्यासाठी चांगलं असेल. समाज काय म्हणतो घरचे काय म्हणतात, मित्रपरिवार नातेवाईक कोण काय म्हणतं यापेक्षा तिनं आपल्या स्वतःचा विचार करावा आणि आपल्यावर झालेल्या

अत्याचाराविरुद्ध लढावं. या कामात तिला सहाय्य करणारे अनेक लोक भेटतील याचाही तिनं विश्वास बाळगावा. तसं नाही झालं तरीही तिनं आपली हिम्मत खचू देता कामा नये. कारण हा शेवटी एक असा सामाजिक लढा आहे ज्यात अनेकांना जीवाच्या करारानं लढावं लागणार आहे. स्वतःची प्रतिष्ठा जपण्यासाठी स्वतःचं स्त्रीत्व टिकवण्यासाठी तिला हे करावं लागेल. त्याची पहिली पायरी हीच असेल की तिनं बलात्काराला कलंक मानू नये, त्यामुळे आयुष्य संपलं आहे असा विचार करू नये, आपण जगण्यास नालायक आहोत असा समज करून घेऊ नये, त्यामुळे आपण इतरांपेक्षा कमी दर्जाचे झालो आहोत असला विचारही मनात आणू नये. शरिराला झालेला एक अपघात यापेक्षा जास्त महत्त्व त्याला देऊ नये. पण त्याचवेळी स्वतःवर झालेल्या लैंगिक अत्याचाराविषयी कायदेशीर लढाई लढावी. आपल्या मानसन्मानाला हिणवू पाहणा-या प्रत्येकाविरूद्ध तिनं आवाज उठवावा. मी हे वारंवार सांगतोय की या कामांत स्त्रियांनीच पुढाकार घेण्याची गरज जास्त आहे कारण त्या जोवर स्वतःची मदत करणार नाहीत, त्या जोवर मानसिकदृष्ट्या कणखर बनणार नाहीत तोवर अन्य समजूतदार पुरुष त्यांना मदत करू शकणार नाहीत.

आपल्या समाजाची लैंगिक धारणा ही अतिशय बाष्कळ, दांभिक आणि प्रतीगामी स्वरुपाची आहे. त्यामुळे वयात आलेल्या स्त्री-पुरुषांना आपल्या लैंगिक भावनांना आवर घालत एका कुचंबनेतच जगावं लागतं. त्यांतून सुटण्यासाठी मग ते इतर मार्गांचा अवलंब करतात. त्यांत त्यांना सुख कमी आणि दुःख जास्त मिळतं. त्यातही सर्वाधिक नुकसान हे स्त्रियांचंच होतं. लैंगिक स्वातंत्र्याचा विचार आपल्याकडे रुजण्यास अजून बराच वेळ आहे. पण त्यादृष्टीनं वाटचाल करण्याची वेळ आता आली आहे. लैंगिक सुखासाठी लग्नाची अट, लैंगिक सुखावरून इतरांचा फायदा उचलणं, लैंगिकतेचा चारित्र्याशी व पावित्र्याशी संबंध जोडणं, या मूर्खपणाच्या धारणा बदलण्याची आता गरज आहे. एकमेकांच्या संमतीनं लैंगिक

सुख घेण्यात काहीही गैर नाही. पण त्याचबरोबर त्यात सावधानताही बाळगणं महत्त्वाचं आहे तसंच गर्भधारणेचा प्रसंग उद्‌भवलाच तर दोघांनीही त्याची जबाबदारी घेणं गरजेचं आहे. लैंगिक इच्छा पूर्ण करण्यासाठी जर पुरुष वेश्यांकडे जात असतील तर स्त्रियांनाही तो अधिकार आहेच. लैंगिकतेचा आणि प्रेमाचा संबंध जोडणंही चूकीचं आहे. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे स्त्रीपुरुष दोघांनाही आपल्या लैंगिक भूकेसाठी प्रत्यक्ष संभोगाची गरज पडत नाही. हस्तमैथुनाद्‌वारे ते दोघेही स्वतःची ही भूक शमवू शकतात. त्यानं कोणतीही शारिरीक मानसिक हानी होत नाही. विशेषतः स्त्रियांनी याचा अवलंब करण्याची गरज आहे कारण लैंगिक सुखासाठी त्या पुरुषांवर अवलंबून असतात असा पुरुषांचा आणि स्त्रियांचाही जो समज आहे तो चूकीचा आहे. या समजापायी अनेक मुली धोका पत्करूनही लैंगिक सुख घेतात आणि मग पस्तावतात.

स्त्रीचं शरीर हे तिचं स्वतःचं आहे. त्यावर फक्त तिचाच अधिकार आहे. त्याचं काय करायचं याचा निर्णय तिनं घ्यायचा आहे. त्याचं इतरांकडून शोषण होणार नाही, त्याचा अनुचित लाभ कोणी घेणार नाही याची काळजी तिनंच घ्यायची आहे. ती याबाबतीत जितकी मुक्तपणे वागेल, तितका तिलाच फायदा होईल. तिनं जर समाजाच्या चूकीच्या धारणा स्वतःवर लादून घेतल्या तर मात्र तिची कधीच सुटका होणार नाही. निर्णय घेण्याचं धाडस तिला दाखवावंच लागेल जर ही परिस्थिती तिला बदलायची असेल तर. ती यात एकटी असणार नाही हे मात्र नक्की.

***



## 12. बलात्कार आणि पुरुष

**माकडांच्या टोळीत एक मुख्य नर असतो, टोळी प्रमुख. टोळीतील अन्य सर्व नर त्याच्या धाकात असतात. टोळीतील सर्व माद्या फक्त या मुख्य नराच्या असतात. त्यांच्यावर फक्त हा नरच अधिकार गाजवत असतो. ज्यात लैंगिक अधिकारही आलाच. जो या टोळीसाठी महत्त्वाचा असतो. मुख्य नराला टोळीतील कोणतीही मादी चालते. त्यांचे रक्ताचे संबंध कोणतेही असले तरी त्यानं काहीही फरक पडत नाही. तसेही हे संबंध माकडांमध्ये नसतातच. त्यामुळे मानवी नजरेतून पाहिलं तर हा टोळी प्रमुख आपल्या पाच-सहा बायका आणि त्याच्या मुलींसोबतही लैंगिक संबंध ठेवतो. त्याच्या बहिणी यातून सहसा सुटतात. त्याचं**

**कारण मात्र वेगळं आहे. या टोळी प्रमुखाला टोळीतील अन्य वयात येणारे व लैंगिक सुखासाठी आसुसलेले नर आव्हान देत असतात. त्यांच्याशी मुख्य नराची येता जाता भांडणं होत असतात. त्यांतून अनेक धोकादायक नरांना टोळीतून हाकललं जातं, प्रसंगी मारलंही जातं. बाकीचे उरलेले नर याच्या धाकात राहतात. जे नर बाहेर पडतात ते संधीच्या शोधात असतात. योग्य वेळ येताच ते पुन्हा एखाद्या उतार वयाच्या नराशी झुंझतात त्याला हरवतात, मारतात आणि त्या टोळीचा कब्जा घेतात. टोळीतील सर्व माद्या त्याला लागू होतात. आधी म्हटलंय की, टोळी प्रमुखाच्या बहिणी त्याला सहसा भोगायला मिळत नाहीत कारण त्या आधीच त्याच्या टोळीप्रमुखाकडून त्याची हकालपट्टी झालेली असते. पण तसं झालं नाही तर तो त्यांनाही सोडत नाही.**

हे सारं वाचायला कदाचित घृणास्पद वाटेल पण हे सत्य आहे. माकडांच्या अशाच टोळ्यांमधून माणसांचा जन्म झालेला आहे. त्याच्या लैंगिक वृत्ती या आजही तशाच आहेत. पण आपण माणसं आहोत त्यामुळे माकडांपेक्षा आपल्यांत वेगळेपणा निश्चितच आहे. वेगळेपणा आहे तो माणसांवर होणा-या चांगल्या संस्कारांचा. माणसं केवळ शारिरीकदृष्ट्याच नाही तर मानसिकदृष्ट्याही विकसीत होत असतात. हजारो वर्षांपासून आपल्यावर चांगले वागण्याचे सामाजिक जीवनात योग्य पद्धतीने जगण्याचे संस्कार केले जात आहेत त्यामुळे आपली मानसिकता मोठ्या प्रमाणात बदलली आहे. त्यामुळेच माणूस हा निव्वळ प्राणी नसून तो एक सामाजिक, सांस्कृतिक, बुद्धिमान, समंजस प्राणी आहे. पण असं असलं तरी या सर्व थरांच्या आत त्याचं पाशवी रूप आजही टिकून आहे.

त्याच्या आदिम भावना आजही अबाधित आहेत. यातली सर्वांत प्रबळ भावना आहे लैंगिकतेची. आणि पुरुषांमध्ये ती आजही तितक्याच उत्कटतेने वास करत आहे.

निसर्गतःच पुरुष हा कायम नर असतो आणि सर्व स्त्रिया त्याच्यासाठी केवळ माद्याच असतात. हे वाक्य थोडं तीव्र वाटेल पण तेच सत्य आहे. पुरुषाच्या दृष्टीनं सर्व स्त्रिया या उपभोगक्षम असतात. त्यामुळेच एका स्त्रीनं त्याचं कधीच समाधान होत नाही. मानसिक आणि शारीरिक पातळीवर त्याला कायम वेगवेगळ्या स्त्रियांचा सहवास हा हवा असतो. तो जोवर आदिम अवस्थेत होता तोवर त्याच्या या भावना तो उघडपणे व्यक्त करायचा. त्यासाठी लढायचा आणि जिंकल्यावर सर्व माद्या त्याला शरण जायच्या. आता तसं होत नाही. कारण या मधल्या काळात माकडांचं प्राण्यामधून एका संस्कारी विचारी माणसांत रुपांतर झालं आहे. त्यात जसा पुरुषांचा समावेश आहे तसाच स्त्रियांचाही समावेश आहे. पण काहीअंशी आतलं प्राणीपण अजूनही टिकून आहे. पुरुषांत ते जास्त प्रमाणात टिकून आहे कारण मादी मिळवण्याची त्याची आदिम लालसा, उपभोग घेण्याची त्याची तीव्र इच्छा ही अजून पूर्णपणे विझलेली नाही. माणसांच्या बाबतीत एक गोची अशीही आहे की, त्यांच्यात इतर प्राण्यांमध्ये असतो तसा संभोगाचा विशिष्ट काळ नसतो. ते केवळ वंशवाढीसाठीही संभोग करत नाहीत. या दोन गोष्टींमुळे पुरुषांची अडचण झाली आहे. आणि अर्थातच स्त्रियांचीही. वर्षाच्या सर्व दिवसांत लैंगिक भावना जागृत असल्यामुळे आणि तिचा संबंध सुखाशी जोडला गेल्यामुळे हे सुख मिळवण्यासाठी सर्व वयात आलेले पुरुष उत्कंठीत असतात. आपण आता टोळ्यांमध्ये राहत नसल्याने हे सुख मिळवण्यासाठी काही अटी पूर्ण कराव्या

लागतात. लग्न किंवा हव्या त्या स्त्रीची पूर्व संमती मिळणं या दोन मुख्य अटी आहेत. ज्यांना त्या पूर्ण करता येतात त्यांचं लैंगिक आयुष्य सुरू होतं. अर्थात एकाच स्त्रीनं त्यांचं समाधान होतं असं नाही. एकीसोबत राहत असतानाही अन्यांचा विचार त्यांच्या मनात असतोच आणि संधी मिळताच ते आपलं समाधान करूनही घेतात.

पण ज्यांना या संधी मिळत नाहीत, जे या अटी पूर्ण करू शकत नाहीत अशा पुरुषांचीही संख्या प्रचंड असते. ते मग यातनं वेगळे मार्ग शोधतात. वेश्यावृत्ती हा त्यातला एक महत्त्वाचा मार्ग. दुसरा आहे हस्तमैथुनाद्वारे स्वसमाधान करून घेणे. तिसरा आहे पुरुषांपासूनच स्वतःचं समाधान करून घेणे. ब्रह्मचर्य हाही एक मार्ग आहे. पण यातूनही अनेक पुरुष असमाधानीच राहतात जे मग जबरदस्तीनं हे सुख मिळवण्याचा प्रयत्न करतात. आपली सध्याची सामाजिक आखणी याला प्रतिकूल आहे त्यामुळे हे जबरदस्तीचं सुख किंवा एकूणच लैंगिक सुख मिळवण्यात पुरुषांवर अनेक बंधनं लादली गेली आहेत. माणसांनी कौटुंबिक व्यवस्थेचा, लग्न संस्थेचा स्वीकार केल्यानंतर रक्तसंबंधातल्या स्त्रीशी लैंगिक संबंध ठेवणं हे अनैतिक मानलं जाऊ लागलं. त्याचा परिणाम असा झाला की, पुरुषांना त्यांच्या कुटुंबातल्या हक्काच्या स्त्रियांवरचा अधिकार गमवावा लागला. लैंगिक संबंधांसाठी त्यांना बाहेरच्या स्त्रियांकडे वळावं लागलं. लग्नाला आधी शरीरसंबंध असं म्हटलं जायचं हे इथं लक्षात ठेवावं लागेल. याचा परिणाम असा झाला, की पुरुषांमध्ये स्त्रियांना मिळवण्याची स्पर्धा अधिक तीव्र झाली. मुक्त लैंगिक संबंधांना मान्यता नसल्यामुळे, या संबंधांना एकूणातच चोरटेपणा आला. त्याला

पाप मानण्यात येऊ लागलं. स्त्री ही पुरुषांच्या, कुटुंबाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न बनली आणि यात अधिक भर पडली. स्त्रीचं स्वातंत्र्य पुरुषांच्या वर्चस्वाखाली नाहीसं झालं आणि तिची परवड सुरू झाली. यात लैंगिक स्वातंत्र्याचाही समावेश होता. तिच्या इच्छा-आकांक्षांना कोणतंचं मूल्य न उरल्यामुळे तिची तर परवड झालीच पण पुरुषांचीही झाली. स्त्रीला तिच्या इच्छेनुसार हवं ते लैंगिक सुख मिळवण्यावर कठोर मर्यादा आल्या. पुरुषांना त्यामुळे हवी ती स्त्री मिळवणं कठीण झालं. लैंगिक संबंधांना नैतिकतेच्या चारित्र्याच्या कसोट्या लावल्या गेल्यामुळे तर अधिकच वासलात लागली. एका नैसर्गिक भावनेचा माणसांनी पार चोळामोळा करून टाकला. त्याचे परिणाम आपण हजारो वर्षांपासून भोगत आहोत.

माणसांच्या माणूस होण्याच्या प्रक्रियेत स्त्रीही अधिकाधिक स्वतंत्र होत गेल्यामुळे तिच्या इच्छांना सर्वोच्च स्थान लाभलं. निदान तत्वतः तरी. दुसरीकडे पुरुषांची लैंगिक वृत्ती पूर्णपणे क्षमली नाही. यामुळे झालं काय की स्त्रिया प्रत्येक पुरुषाशी रत होण्यास नकार देऊ लागल्या आणि पुरुष त्यांना हव्या असलेल्या व हव्या तितक्या स्त्रियांशी लैंगिक संबंध ठेवता न आल्यामुळे लैंगिक संबंधात आग्रही व आक्रमक होऊ लागले. याची परिणती झाली बलात्कारांत. लैंगिकतेचे इतर सर्व पर्याय हाताळल्यानंतर पुरुष बलात्काराकडे वळू लागले हे ध्यानात ठेवावं लागेल. या लैंगिकतेचा संबंध प्रेमाशी, मालकी भावनेशी, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय कारणांशी आल्यामुळे हे प्रकरण अधिक गुंतागूंतीचं बनलं आहे. वयात आलेले सारे पुरुष, काही अपवाद वगळता, सर्व काळ पुरुषच असतात आणि

त्यांच्या लैंगिक भावना जागृतच असतात. केवळ संयमापोटी, विचारीपणामुळे पुरुष हे आपल्या या भावनांना काबूत ठेवत असतात. ही कठीण गोष्ट आहे पण ती त्यांनी साध्य केली आहे. उघडपणे तरी ते तसं वागतात हे सत्य आहे. आत त्यांच्या मनांत काय विचार असतील हे सांगण्याची गरज नाही. ही त्यांची नैसर्गिक गोची आहे. ती स्त्रियांनी मान्य करायला हवी आणि त्यांच्याकडे सहानुभूतीनं पहायला हवं. पुरुषांच्या लैंगिक आक्रमकतेला आपल्या समाजानं ज्या चुकीच्या लैंगिक पद्धती अवलंबिल्या आहेत त्या अधिक जबाबदार आहेत. याचा अर्थ असा नाही की बलात्काराचं समर्थन केलं जावं. कारण आपण शेवटी माणसं आहोत. आपण स्त्री-पुरुषांना व्यक्ती मानतो, त्यांचं स्वातंत्र्य त्यांचे अधिकार आपण मान्य करतो. त्यात सर्वांत महत्त्वाचा अधिकार हा लैंगिक स्वातंत्र्याचा अधिकार आहे. स्त्रीच्या या लैंगिक स्वातंत्र्यावर घाला घालण्याचा कोणताही अधिकार पुरुषांना नाही. त्यामुळे लैंगिक अत्याचाराचं समर्थन होऊ शकत नाही. पण याचा अर्थ आपण पुरुषांच्या लैंगिक कुचंबनेला दुर्लक्षिक करावं असाही होत नाही. पुरुषच कशाला स्त्रियादेखील आणि त्या तर मोठ्या प्रमाणात या लैंगिक कुचंबनेला बळी पडतात. योग्य त्या वयात लैंगिक सुख न मिळाल्याचे भीषण शारिरीक व मानसिक परिणाम दोघांनाही भोगावे लागतात. सामान्य माणूस या परिणामांनी मोडून पडतो.

हे टाळायचं असेल तर आपल्या सामाजिक मानसिक लैंगिक धारणांमध्ये क्रांतिकारी बदल घडण्याची गरज आहे. मुक्त पण जबाबदार लैंगिक संबंधामुळे लैंगिक अत्याचाराच्या घटना मोठ्या प्रमाणात टाळल्या जाऊ शकतात. पण काही

घटना मात्र टाळल्या जाणार नाहीत कारण पुरुष हे केवळ लैंगिक सुखासाठीच बलात्कार करत नाहीत तर ब-याचदा त्यामागे त्या स्त्रीला किंवा तिच्या कुटुंबाला धडा शिकवण्याचाही उद्देश त्यामागे असतो. स्त्रीच्या कौमार्याचा संबंध तिच्या, तिच्या कुटुंबाच्या व तिच्या राष्ट्राच्या अब्रुशी जोडला गेल्यामुळेही तिच्यावर बळजबरी केली जाते. तिचं लैंगिक शोषण व्हायला आर्थिक राजकीय कारणंही जबाबदार असतात. याचा अर्थ दुर्देव्यानं हे प्रकार पूर्णपणे कधीच बंद होणार नाहीत. ते कमी करण्यासाठी आपण प्रयत्न करू शकतो, बलात्कारीत स्त्रियांचा अपमान न करता त्यांच्याशी समान पातळीवरच वागून आपण त्यांच्या या वेदना कमी करु शकतो, बलात्कार म्हणजे कलंक, अपमान, जगण्याचा शेवट या समजातून बाहेर येऊ शकतो, या सर्वांचा एकत्रित परिणाम चांगला असू शकेल. याकामी अर्थातच पुरुषांना पुढाकार घ्यावा लागेल. स्त्रियांनाही तो घ्यावा लागेल. समाजालाही स्वतःला बदलावं लागेल. तरंच याबाबतीत आपण काही करू शकतो.

***